वर्ष ४६
अंक ५

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

मे २०२६
वैषाख/अधिक ज्येष्ठ
शके १९४८

**बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा!**

नमस्कार मंडळी

आज १ मे - महाराष्ट्र दिन! ज्ञानेश्वर-तुकाराम यासारख्या संतांचा, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांसारख्या पराक्रमी योद्ध्यांचा, लोकमान्य टिळक आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या महान स्वातंत्र्यसेनानींचा, तसेच असंख्य नामवंत मराठी कलाकार, खेळाडू, साहित्यिक, कवी, राजकारणी आणि लष्करी अधिकाऱ्यांचा हा महाराष्ट्र—आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा विषय आहे. जगभरातील माझ्या सर्व मराठी बंधू-भगिनींना महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा. त्याचप्रमाणे संयुक्त महाराष्ट्र आणि मुंबईसाठी लढताना हौतात्म्य पत्करणाऱ्या १०६ वीरांना आदरांजली. मराठी भाषा व संस्कृती परदेशात जपायची मोठी जबाबदारी आपण घेतली आहे आणि आपल्याकडून आपली पुढील पिढी त्यांच्या पुढील पिढीला हा वारसा नक्की देईल यात कोणतीही शंका नाही.

सिॲटलच्या अधिवेशनाची तयारी जोरात चालू आहे. मी सर्व मंडळाच्या अध्यक्षांना विनंती करतो की त्यांनी या अधिवेशनाची माहिती तसेच BMM Awards, BMM Youth Scholarship, आणि BMM Book Publication याबद्दलची माहिती आपल्या मंडळातील सर्व मंडळींपर्यंत पोहोचवावी. सिॲटलला येणाऱ्या कलाकारांच्या व्हिसा प्रक्रियेसोबतच त्यांच्या प्रवासाबद्दलचे नियोजन ही सुरू आहे. या सगळ्या धामधुमीत “विद्यार्थी सहाय्यक समिती”तील (VSS) विद्यार्थ्यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. स्वतःच्या अभ्यासासोबत ते अधिवेशनाच्या संकेतस्थळाचे सुशोभीकरण, कार्यक्रमाचे फ्लायर्स तसेच व्हिडिओ बनवून मार्केटिंगमध्ये मदत करत आहेत - हे खरोखरच कौतुकास्पद आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या त्यांच्या वरिष्ठांचे मनःपूर्वक अभिनंदन!



*(VSS सदस्य: डावीकडून प्राजक्ता बावधनकर, ओमकार वाघमारे, मकरंद फडके, तुषार रंजणकर, शुभम गलांडे, आणि जय सनेर)*

ज्योतिषशास्त्राचा वर्ग नुकताच यशस्वीरीत्या पूर्ण झाला आहे. गेल्या पंधरा महिन्यांपासून सुरू असलेल्या या उपक्रमानंतर आता विद्यार्थ्यांच्या परीक्षा होत आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

‘समाजरंग’ उपक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या ‘आशा’ निधी संकलन मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. साउथ फ्लोरिडा, फिलाडेल्फिया, डेलावेर, त्रिवेणी मित्र मंडळ, ऑस्टिन आणि कनेक्टिकट या मंडळांच्या सहकार्याने $१०,००० पेक्षा अधिक निधी संकलित झाला आहे. या सर्व देणगीदारांचे मनःपूर्वक आभार. या उपक्रमाबद्दल अधिक माहिती या अंकात वाचायला मिळेल.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या निवडणुका आता जाहीर झाल्या आहेत. निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना मनःपूर्वक शुभेच्छा! निवडणूक प्रक्रिया, नव्या सुधारणा आणि उमेदवारांविषयी सविस्तर माहिती मिळवण्यासाठी कृपया बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळाला भेट द्या. https://bmmonline.org/elections/

मे महिना म्हणजे मराठी शाळांच्या परीक्षांचा महिना. गेल्या अनेक महिन्यांपासून या परीक्षा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी मेहनत घेणाऱ्या सर्व शिक्षक आणि स्वयंसेवकांचे मनापासून आभार. यावर्षी जवळ जवळ ३,००० विद्यार्थी बृहन्महाराष्ट्र मंडळाची परीक्षा देत आहेत, तर जवळजवळ ३०० विद्यार्थी बालभारतीची परीक्षा देत आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा!

जून महिन्यात आम्ही विद्यार्थ्यांसाठी Yuwa Summer Mentorship, Summer Volunteering in India, त्याचप्रमाणे Medical Internship in India हे उपक्रम घेऊन येत आहोत. तसेच, Avant या संस्थेबरोबर आम्ही नुकताच एक सामांजस्य करार (MOU) केला. त्यानुसार आता आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी भाषेसाठी ‘Foreign Language Credits’ आणि ‘Global Seal of Biliteracy’ ही मिळू शकते. या सर्व उपक्रमांबद्दलची अधिक माहिती मिळवण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळाला भेट द्या. https://bmmonline.org/

लेखाची सांगता करण्याआधी येणाऱ्या ‘Mother’s Day’ निमित्त सर्व मातांना शुभेच्छा, तसेच 'जागतिक कामगार दिन' आणि ‘बुद्ध पौर्णिमेच्या’ ही सर्वांना शुभेच्छा! जय हिंद - जय महाराष्ट्र!

आपला,

प्रसाद पानवळकर, अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:

ईमेल: vrutta@bmmonline.org

बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-

**BMM Treasurer - Santosh Salvi**

**4 Azalea Lane, Nashua, NH 03062**

**Ph: 603 438 9279**

**Email: santosh.salvi@bmmonline.org**

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75

**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)**

**मताधिकार असलेले सदस्य**

| | |
|---|---|
| अध्यक्ष: | प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस |
| सचिव: | नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना |
| कोषाध्यक्ष: | संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर |
| सदस्य: | पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया |
| | मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो |
| | गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा |
| | राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया |
| | आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी |

**नियुक्त सदस्य**

माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो

**विश्वस्त समिती**

| | |
|---|---|
| अध्यक्ष : | नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय |
| सदस्य: | सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट |
| सदस्य: | मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा |
| प्रकाशक: | बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका |

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात

| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| बृहन्महाराष्ट्र मंडळ – संस्थापकांना मानवंदना | ३ |
| २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल | ४ |
| आरोग्य संपदा | ६ |
| खण: गोड कथा सांगणारं कापड | ७ |
| अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख | ९ |
| पिसारा की पसारा | ११ |
| कविता: साठवण | १३ |
| प्रवास वीणा वर्ल्डचा | १३ |
| जाहिरात | १४ |
| आनंदाचे देणे | १५ |
| वेद, गीता की ज्ञानेश्वरी? | १७ |
| कविता: स्त्रीचा दिवस | १७ |
| आर्टेमिस, चंद्र आणि मानवापुढची कसोटी | १८ |
| राशिभविष्य | २० |
| पारावरच्या गप्पा | २० |
| श्री स्वामी समर्थ | २२ |
| कविता: वय | २२ |
| मराठवाडा पूरग्रस्त निधी लाभार्थी - एका शेतकऱ्याचा परिचय | २३ |
| Jnana Prabodhini (BMM Fundraiser 2025) | २३ |
| Project ASHA Fundraiser Report | २६ |
| जाहिरात | २७ |
| जाहिरात | २८ |
| जाहिरात | २९ |
| जाहिरात | ३० |
| जाहिरात | ३१ |
| MANA Paintings | ३२ |

## संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :

Email - Vrutta@Bmmonline.org

आलेल्या प्रतिक्रियां पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. शब्दमर्यादा: १०० शब्द.

## बृहन्महाराष्ट्र मंडळ – संस्थापकांना मानवंदना

बृहन्महाराष्ट्र मंडळाची स्थापना १९८१ साली शिकागो येथे **सौ. जयश्री हुपरीकर, श्री. शरद गोडबोले** आणि **श्री. विष्णू वैद्य** या दूरदृष्टी असलेल्या व्यक्तींनी केली—ही गोष्ट आपल्यापैकी अनेकांना ज्ञात आहे. आज या तिघांपैकी कोणीही आपल्या सोबत नसले तरी त्यांचे कार्य आणि वारसा आजही आपल्याला प्रेरणा देत आहे.

या महान संस्थापकांचे छायाचित्र मिळवण्याचा मी काही काळ प्रयत्न करत होतो. या संदर्भात बृहन्महाराष्ट्र मंडळाचे विश्वस्त आणि शिकागो येथील रहिवासी, श्री. नितीन जोशी, यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी मला अनिताताई गोडबोले आणि प्रभाताई वैद्य यांचा संपर्क दिला.

दोघींशी संवाद साधताना जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. मी त्यांना छायाचित्रांबाबत विचारणा केली असता, प्रभा ताईंनी तत्परतेने एका दिवसात काही मौल्यवान जुनी छायाचित्रे पाठवली. त्यापैकी दोन छायाचित्रे आता बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत: https://bmmonline.org/about/



**डावीकडून: सौ.जयश्री हुपरीकर, श्री. शरद गोडबोले, आणि श्री. विष्णू वैद्य**





**डावीकडून: शंकर आणि जयश्री हुपरीकर, शरद आणि अनीता गोडबोले, विष्णू आणि प्रभा वैद्य**

ही छायाचित्रे म्हणजे आपल्या सर्वांकडून संस्थापकांना अर्पण केलेली एक छोटीशी पण मनापासूनची मानवंदना आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आपणही समाजासाठी काहीतरी सकारात्मक घडवू—हीच अपेक्षा आणि प्रार्थना.

तसेच तुम्हाला जर साहित्यात आणि इतिहासात रस असेल तर एक अमूल्य ठेवा नुकताच मिळाला आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे सहसंस्थापक श्री विष्णू वैद्य यांच्या पत्नी प्रभाताई वैद्य यांनी मला बृहन्महाराष्ट्र वृत्ताची पहिली आवृत्ती पाठवली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे जानेवारी १९८१ मधील ही प्रत हे हस्तलिखित असून बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सहसंस्थापिका सौ. जया ताई हुपरीकर यांनी ते लिहिलेले आहे.




असे सांगण्यात येते की जया ताई पुढील अनेक वर्ष स्वतःच्या हाताने वृत्त लिहून प्रसिद्ध करीत असत.

त्याच बरोबर प्रभाताईंनी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या रोप्य महोत्सवाच्या वर्षी (२००५) प्रसिद्ध झालेला जया ताईचा एक लेख पण पाठवला.

या दोन्ही अमूल्य गोष्टी आता बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वृत्तच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत: bmmonline.org/vrutta/

कृपया वेळ मिळेल तसे वाचा आणि मित्रमंडळींना पण कळवा

याचबरोबर, गेली अनेक वर्षे अविरत परिश्रम घेणाऱ्या सर्व स्वयंसेवकांचे मनःपूर्वक आभार. त्यांच्या निष्ठा आणि समर्पणामुळेच आज बृहन्महाराष्ट्र मंडळ विविध उपक्रमांद्वारे समाजसेवा करत आहे—हे आपले भाग्य आहे.

- **प्रसाद पानवळकर,** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

## २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल

***स्वयंसेवक संवाद आणि स्नेह मेळावा- ११ एप्रिल***



बीएमएम वृत्ताच्या सर्व वाचकांना नमस्कार! आणि १ मे –महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा! महाराष्ट्र दिन हा केवळ राज्य स्थापनेचा दिवस नाही, तर आपल्या समृद्ध परंपरा, संस्कृती, कलेचा वारसा आणि एकात्मतेचा अभिमान व्यक्त करण्याचा दिवस आहे. याच भावनेतून, मराठी माणसांना एकत्र आणणारे बीएमएमचे अधिवेशन आपल्या मराठी ओळखीची जाणीव दृढ करत आपल्या मित्रत्वाच्या, बंधुत्वाच्या नात्याला अधिक घट्ट करणार आहे. बीएमएम२०२६ सिॲटल अधिवेशनाची तयारी आता जोमात सुरु आहेच. विविध समित्या, स्वयंसेवक/कार्यकर्ते पूर्ण उत्साहाने काम करत आहेत.

**तिकीटविक्रीबाबत महत्त्वाची माहिती:**

दुसऱ्या टप्प्यातील तिकीट दर १ मे पासून लागू झाले आहेत. तिसऱ्या टप्प्यातील तिकिटाचे दर ४ जुलै पासून लागू होतील. पुढील वाढ होण्यापूर्वी लवकरात लवकर नोंदणी करा.

**दुसरा टप्पा - १ मे महाराष्ट्र दिन - ३ जुलै - $६००**

**तिसरा टप्पा - अमेरिका स्वातंत्र्यदिन, ४ जुलै ते अधिवेशन शुभारंभ ६ ऑगस्ट - $७००**

**भोजन विरहीत तिकीट** (without food) मात्र अजूनही मोठ्यांसाठी **$३५०** आणि **१८ वर्षांखालील मुलांसाठी $२२५** ला उपलब्ध आहे.

**कार्यक्रम:**

यंदाच्या अधिवेशनातील एक खास आकर्षण ठरणार आहे **'द फोक आख्यान'** — मराठी मातीतील लोकसंगीताचा भरजरी नजराणा! "थाट जुना, खेळ नवा" या संकल्पनेतून, आजच्या पिढीला भावेल अशा नव्या रूपात लोककलेची मांडणी या कार्यक्रमात अनुभवायला मिळेल. भारतात तूफान गाजत असलेला हा कार्यक्रम आता आपल्या सिॲटल अधिवेशनात रंगणार आहे.

उत्तर अमेरिकेतील स्थानिक कलाकारांकडून निवडलेले अनेक दर्जेदार कार्यक्रम यंदाच्या अधिवेशनात रंगत आणणार असून विविधतेने नटलेला हा सांस्कृतिक मेळा त्यामुळे खास ठरणार आहे.

- **सावित्रीच्या लेकी – गोष्ट तिच्या अस्तित्वाची:** न्यू जर्सी मधून स्वरनाद School of Music सादर करत आहे एक थरारक संगीतमय प्रवास. संघर्ष, स्वप्नं आणि जिद्दीची जिवंत कहाणी - नाट्य, नृत्य आणि सुरांनी सजलेली!
- **El Dorado:** न्यू जर्सी - हिंदुस्थानी संगीत, कथक नृत्य, काव्य आणि दृश्यकलेचा सुरेख संगम असलेला, आनंदाच्या शोधाची प्रतीकात्मक कहाणी मांडणारा बहुआयामी नाट्यप्रयोग
- **भाईगिरी:** शिकागो – (पु. ल. देशपांडे) भाईच्या कारकिर्दीचा आढावा
- **नाट्यस्वर:** - मानापमान ते कट्यार - ऑस्टिन टेक्सस
- **तीर्थ विठ्ठल:** बे एरिया - ह्या कार्यक्रमाचं वैशिष्ट्य म्हणजे मराठी बांधवांच्या दुसऱ्या पिढीतील कलाकाराचे सादरीकरण ह्यात असेल

- **अवघा रंग एक झाला:** बे एरिया - परंपरेशी घट्ट जोडलेल्या जुन्या पिढीचा आणि आधुनिक विचारांच्या नव्या पिढीचा संघर्ष उलगडणारे दोन अंकी संगीत नाटक
- **बहुरंगी:** पोर्टलंड - संगीत कार्यक्रम
- **गोंद्या आला रे:** पोर्टलंड - क्रांतीवीर चाफेकर बंधूंची कहाणी सांगणारं ऐतिहासिक नाटक
- **सिॲटल लाईट्स:** सिॲटल - सुमधुर गाण्यांचा कार्यक्रम

तसेच, अंतिम फेरीत पोहोचलेल्या उत्कृष्ट एकांकिका आणि ढोल-ताशा पथकांची धमाकेदार सादरीकरणे या अधिवेशनाला खास रंगत आणतील. 🎭🥁

**अधिवेशन संकल्पना गीत – Theme Song 🎵🎶**

अधिवेशन संकल्पना गीत आता तयार झाले आहे. या गीताचे बोल सुप्रसिद्ध कवी श्री. संदीप खरे यांनी लिहिले असून, संगीत दिग्दर्शन सिॲटलमधील स्थानिक कलाकार / गायक श्री. प्रसन्न गणपुले यांनी केले आहे. - सिॲटलमधील स्थानिक गायकांनी हे गीत गायले असून वाद्यवृंदात आधुनिक वाद्यांबरोबरच ढोलताशा सारख्या पारंपरिक वाद्यांचाही समावेश आहे.

उत्तर अमेरिकेत राहत असताना येथील मराठी बांधव मराठी संस्कृती आणि भाषा जपण्यासाठी करत असलेल्या प्रयत्नांचे, तसेच सर्वांनी एकत्र येऊन हे नाते जपण्याच्या भावनेचे प्रतिबिंब या गीतात उमटले आहे.` “जपूया संस्कृती, विणूया नाती” या घोषवाक्याचा अत्यंत सुंदर वापर या गीतात करण्यात आला आहे.

आमच्या मार्केटिंग टीमने उत्तर अमेरिकेतील सर्व मंडळांकडून त्यांच्या उपक्रमांविषयी साहित्य मागवून त्याचा वापर या गीताच्या व्हिडिओ चित्रीकरणासाठी केला आहे.

या गीताचे अनावरण सिॲटल मंडळाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित संगीत कार्यक्रमात, अनेक मान्यवर आणि उपस्थितांच्या साक्षीने करण्यात आले.

अतिशय सुंदर शब्दांनी आणि सुरेल चालीने सजलेले हे गीत आपण आमच्या YouTube चॅनेलवर नक्की ऐका.

**🎶 🎤 स्वरमंच स्पर्धेला भन्नाट प्रतिसाद!**

**स्वरमंच या गाण्यांच्या स्पर्धेला इंस्टाग्रामवर अक्षरशः भरभरून प्रतिसाद मिळत आहे!** एकल (सोलो) असो की समूह (ग्रुप), मोठ्या संख्येने स्पर्धकांनी त्यांच्या सादरीकरणाचे व्हिडिओज पाठवून स्पर्धेला रंगत आणली आहे. खरं सांगायचं तर... परीक्षकांसाठी अंतिम फेरीसाठी विजेत्यांची निवड करणं खूप कठीण होणार आहे!लवकरच अंतिम फेरीतील स्पर्धक जाहीर करून आम्ही हे गुणी गायक तुमच्यासमोर सादर करणार आहोत. तयार रहा एका सुरेल मेजवानीसाठी! 🎶✨

**आम्हाला आपल्या मदतीची नितांत गरज आहे** —

काही प्रायोजकांनी MoU करून स्पष्ट बांधिलकी दिल्यानंतरही माघार घेतल्याने अधिवेशनाच्या तयारीवर अनपेक्षित ताण निर्माण झाला आहे आणि अनेक महिन्यांच्या नियोजनावर त्याचा परिणाम झाला आहे. तरीही, आम्ही निर्धाराने पुढे जात आहोत. या कठीण प्रसंगी समुदायाकडून मिळणाऱ्या ठाम पाठिंब्याबद्दल आम्ही मनापासून कृतज्ञ आहोत.

देणगीदार व्हा, तिकीट खरेदी करा आणि स्वयंसेवक म्हणून सहभागी व्हा. आपण सर्व मिळून हे अधिवेशन भव्य, यशस्वी आणि अविस्मरणीय करू ही केवळ आशा नाही, तर आमचा ठाम विश्वास आहे. संस्कृतीच्या या उत्सवात आपला मोलाचा वाटा नक्की उचला. संपर्क : donations@bmmseattle2026.org

आपल्या सततच्या पाठिंबा, विश्वास आणि सहभागाबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार. भेटूया सिॲटलमध्ये... #Seaya तोवर आमच्या समाज माध्यमांवर भेटत राहू 👇🏼

**संकेतस्थळ:** https://bmmseattle2026.org
**यूट्यूब:** www.youtube.com/@BMM2026SEATTLE
**फेसबुक पेज:** www.facebook.com/bmm2026seattle
फेसबुक ग्रुप: www.facebook.com/groups/bmm2026seattle
**इंस्टाग्राम:** www.instagram.com/bmm2026seattle
**इमेल-पत्ता:** स्नेहसंमेलनासंबंधीच्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी info@bmmseattle2026.org

आपला विश्वास, आपली साथ - हाच आमचा प्रेरणा स्रोत आहे. चला, जपूया संस्कृती, विणूया नाती !!! 🙏🌸

- **अश्विनी क्षीरसागर,** (बीएमएम २०२६ समिती)



## आरोग्य संपदा

**आरोग्य संपदा हा बृहन्महाराष्ट्र मंडळाचा नवीन उपक्रम जानेवारी २०२६ मध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रसाद पानवळकर यांनी सुरु केला. या नव्या उपक्रमाच्या संदर्भात आम्ही त्यांच्याशी केलेली बातचीत या अंकात सादर करीत आहोत.**

**वृत्त चमू: उपक्रम सुरु करण्यामागे काय विचार होता आणि त्याची सुरुवात कशी झाली?**

**प्रसाद:** मी गेली अनेक वर्षे आरोग्यविषयक वेगवेगळ्या उपक्रमांत भाग घेत आहे. २०१२ साली मी Iron man 70.3 मध्ये भाग घेतला होता. त्यावेळी माझ्या लक्षात आलं की व्यायामविषयक उपक्रमांचा अनेकांना फायदा होईल. २०१३ मध्ये मी ऑस्टिन मंडळाचा अध्यक्ष झाल्यावर बाकी कार्यक्रमांबरोबर आरोग्यविषयक उपक्रम (Health initiative) सुरू केले. त्याचा शुभारंभ मंडळातर्फे आयोजित केलेल्या 10 K नी झाला. त्याच वर्षी संक्रांतीला Health and Wealth व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती त्यातील आरोग्यविषयक व्याख्यान मी दिले. त्यानंतर गेली अनेक वर्षे अशा प्रकारच्या सेमिनारमध्ये मी आरोग्यविषयक, निरोगी जीवनशैलीबद्दल माहिती देत आहेत. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्षपद स्वीकारल्यावर बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे आरोग्य आणि निरोगी जीवनशैलीबद्दल एखादा उपक्रम सुरु करावा अशी इच्छा होती. या वर्षी जानेवारीत आरोग्य संपदा हा उपक्रम सुरु झाला.

**वृत्त चमू: या उपक्रमासाठी विषय कसे निवडले?**

**प्रसाद:** अगदी लहान मुलांपासून वयस्कर लोकांपर्यंत सगळ्यांना आरोग्यविषयक प्रश्न येऊ शकतात ते सगळे या उपक्रमात येतील असा प्रयत्न आहे.

ऑस्टिनचे डॉ. मोहन आचवल आणि बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या समितीमधल्या डॉ. मेधा गोडबोले यांचं मार्गदर्शन घेतलं. डॉ. नितीन चौथाई आणि डॉ. एकनाथ नाईक यांनीदेखील खूप मदत केली. या डॉक्टरांनी केलेल्या मार्गदर्शनात एक मुद्दा असा आला की आरोग्यविषयक उपक्रमांत डायबेटीस, ब्लड प्रेशर असे विषय नेहमी येतात. त्यामुळे या विषयांवर एखादंच सत्र करून इतर विषयांबद्दल चर्चा व्हावी. त्यानुसार आरोग्य संपदामध्ये निद्रा, दंतचिकित्सा, नेत्रचिकित्सा, कॅन्सरबद्दल जागरूकता, कॅन्सर टाळण्याचे उपाय, महिलांचे आरोग्य अशा अनेक विषयांवर या उपक्रमात कार्यक्रम झाले आहेत आणि यापुढेही होणार आहेत.

शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्यदेखील तितकेच महत्वाचे आहे. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष न करता योग्य वेळी मदत घ्यावी. त्यासंदर्भात 'शब्दरूप देऊ, मुक्या भावनांना - Shattering the Silence on Mental Health' हा कार्यक्रम समाजरंगच्या उपक्रमाच्या अंतर्गत झाला होता. जून महिन्यात Silent Struggles: Breaking the Stigma Around Mental Health हा कार्यक्रम आहे. झालेल्या सगळ्या कार्यक्रमांचे रेकॉर्डिंग बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.
https://bmmonline.org/arogyasampada/

**वृत्त चमू: एखादा विषय निवडून तुम्ही जेव्हा डॉक्टरांशी बोलता तेव्हा तो अनुभव कसा होता?**

**प्रसाद:** एखाद्या क्षेत्रातल्या तज्ज्ञ मराठी डॉक्टरांना या उपक्रमात सहभागी होण्यासाठी बोलावतो. बऱ्याचदा वैद्यकीय विषयाबद्दल मराठीत बोलता येईल का अशी चिंता डॉक्टरांना वाटते. तेव्हा आपण गप्पा मारताना जसं बोलतो तसंच बोलायचं असं डॉक्टरांना सांगतो. आपल्या सगळ्यांच्या परिचयाचे पिट्सबर्गचे डॉ. रवी गोडसे यांच्या कार्यक्रमाने उपक्रमाची सुरुवात झाली. याशिवाय अमेरिकेतल्या दुसऱ्या पिढीतल्या डॉ. कोमल पाटील यांचं A Woman’s Hormonal Journey या विषयावर एक सत्र झालं. एकदा विषय ठरवल्यावर चौकशी करायला लागलो की एखाद्या डॉक्टरांनीच दुसऱ्या डॉक्टरांचं नाव सुचवलं असं अनेकदा झालं.

**वृत्त चमू: या उपक्रमाला लोकांचा कसा प्रतिसाद मिळाला? आणि लोकांकडून काय प्रश्न येतात?**

**प्रसाद:** कार्यक्रम चालू असताना साधारण ८० लोकं असतात पण कार्यक्रमाचं रेकॉर्डिंग उपलब्ध आहे त्यामुळे बरेच लोकं नंतर रेकॉर्डिंग ऐकतात आणि ऐकल्याचं आवर्जून कळवतात. हे रेकॉर्डिंग बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेत स्थळावर आरोग्य संपदाच्या पानावर उपलब्ध आहे.
या सत्रांमध्ये मी प्रेक्षकांना सांगतो की वैयक्तिक प्रश्न विचारू नका तर ज्याचा खूप लोकांना फायदा होईल असे सर्वसाधारण प्रश्न विचारा. A Woman’s Hormonal Journey या सत्राला बायकांनी न लाजता मनातले प्रश्न विचारले. कॅन्सर हा खरंतर भीतीदायक विषय

पण डॉक्टर भीती निर्माण होऊ न देता जागरूकता निर्माण करतात आणि खेळीमेळीच्या वातावरणात कार्यक्रम होतात.

**वृत्त चमू: भविष्यातील योजना?**

**प्रसाद:** अजून पुष्कळ विषयांवरचे सादरीकरण बाकी आहे. या गप्पांच्या निमित्ताने स्थानिक मंडळांनी आरोग्यविषयक उपक्रम राबवावेत असे मी आवाहन करतो. त्यामध्ये २१ जूनला योग दिवस, आषाढी एकादशीच्या निमित्ताने वारी, इतर 5K, 10K चालण्याच्या स्पर्धा असे अनेक उपक्रम करता येतील.

आरोग्याच्या संदर्भात आणखीन एक सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे बृहन्महाराष्ट्र मंडळ मैना फाउंडेशनसाठी निधी गोळा करत आहे. मैना फाउंडेशन ब्रेस्ट कॅन्सर आणि मॅमोग्रामसाठी महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागातल्या महिलांना मदत करते.

**वृत्त चमू:** आरोग्य संपदा उपक्रमाची आणि एकंदरीत आरोग्यासंदर्भातली उपक्रमांची तुम्ही अगदी छान माहिती दिलीत. तुम्ही विचारपूर्वक आणि तळमळीने हा उपक्रम सुरु केला आणि आता वाढवत आहात त्याबद्दल तुमचे बृ. म. म. वृत्तातर्फे आभार आणि अभिनंदन. या उपक्रमाच्या पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा.

**- वृत्त समिती**




## खण: गोड कथा सांगणारं कापड

अमेरिकेत राहायला लागल्यापासून दिवाळी किंवा गणपतीसाठी मुंबईला जाणं फारच क्वचित झालं. दसरा-नवरात्रीसाठी तर जवळजवळ कधीच नाही. पण इतक्या वर्षांनंतर यंदा अचानक नवरात्रीच्या काळात मुंबईला जाण्याची संधी मिळाली. कामाच्या प्रवासाचे कारण होतंच, पण मनातली साडी प्रेमी मात्र खूपच उत्साहित होती. नवरात्रीत नऊ रंगांच्या साड्या नेसायच्या, मंदिरात जाऊन सजून-धजून दर्शन घ्यायचं! मी माझ्या काही साड्या बरोबर घेतल्या आणि आईच्या मुंबईतील काही सुंदर सिल्क व कॉटन साड्याही निवडल्या. पण लगेच एक प्रश्न उभा राहिला. प्रत्येक साडीला मॅचिंग ब्लाउज? इतकं सामान बिझनेस ट्रीप वर घेऊन जाणं शक्य नव्हतं. शिवाय आईच्या सगळ्या साड्यांसाठी माझ्याकडे जुळणारे ब्लाउज नव्हते. मग काय करायचं? हाच विचार करताना नकळत बालपणातील नवरात्र आठवायला लागली ... आणि अचानक डोक्यात एक विचार चमकला.... खणाचे ब्लाउज!

लहानपणी आई आणि आजी आम्हाला माहीमच्या शीतलादेवीच्या मंदिरात आणि वांद्र्यातील आमची ग्रामदेवता, जरीमरी देवीच्या मंदिरात "ओटी" भरायला घेऊन जायच्या. मी तेव्हा साधारण पाच-सहा वर्षांची असेन. एकदा आई म्हणाली, "ओटीत ठेवायला आपल्याला काही खण घ्यायचे आहेत, बरं का." माझ्या लहानशा डोक्यात प्रश्नच प्रश्न!! खण म्हणजे काय? आई नक्कीच ड्रॉवर(खण) बद्दल नाही बोलत आहे. की खणखणीत नाणं की खाणं की अजून काहीतरी वेगळी गोष्ट?



मंदिरात गेल्यावर मी ताटात त्रिकोणी आकारात ठेवलेली रंगीबेरंगी, तीन सुंदर कापडं पाहिली - डोळ्यांना अगदी भुरळ पाडणारी. मी उत्सुकतेने विचारलं, "हेच खण आहेत का?" तेव्हा कळलं - हो, खण म्हणजे कापड!

महाराष्ट्रीयन कुटुंबांमध्ये, विशेषतः सारस्वत परंपरेत, ओटीत खण ठेवण्याची प्रथा आहे. पूर्ण साडी अर्पण करता आली नाही, तरी ब्लाउजपीस म्हणून खण अर्पण करणं ही एक गोड, साधी पण अर्थपूर्ण भावना मानली जाते. आणि तिथूनच सुरू झाली या सुंदर कापडाशी माझी ओळख.

**जर कापड बोलू शकत असतं...**

जर कापड बोलू शकत असतं, तर खण कदाचित हसत म्हणाला असता —"मी कधीच सर्वसाधारण होण्यासाठी बनलेला नाही."

कर्नाटकातील गुळेदगुड्डा आणि बागलकोट या भागात शांतपणे विणलं जाणारं, आणि महाराष्ट्राच्या ऊसपट्ट्यात तितकंच प्रेमानं परिधान केलं जाणारं खण हे असं कापड आहे, ज्याच्या प्रत्येक धाग्यात कथा दडलेली आहे. खरं तर "खण" या नावातच एक गोड अर्थ दडलेला आहे—काही ठिकाणी "खण" म्हणजे जणुकाही साखर! असेही वाचण्यात आले आहे ...आणि या गोडव्याइतकंच हे कापड लोकांच्या आयुष्यात मिसळलेले आहे.

पण विणकराला विचाराल, तर तो सांगेल — खण म्हणजे मोजमापाचे एक एकक. अर्धा मीटर म्हणजे एक खण. दोन खण म्हणजे एक मीटर, आणि एका रोलमध्ये तब्बल ४४ खण—म्हणजे २२ मीटर कापड! प्रत्येक खणाच्या कापडामागे एक लय असते — हातमागावर चालणाऱ्या ठोक्यांची. कापसाचे सूत आंध्र प्रदेशातील हिंदूपूरहून, रेशीम बेंगळुरूहून आणि कृत्रिम रेशीम गुजरातहून येतं—पण या सगळ्या धाग्यांना अर्थ देतो तो विणकराचा हात. हातमागावर २० मीटर खण विणायला जवळपास १५ दिवस लागतात, तर पॉवरलूमवर तेच काम एका दिवसात होतं. हा फरक केवळ वेळेचा नाही—तो परंपरा आणि वेग यांच्यातील आहे.

छोटी नक्षी, मोठं व्यक्तिमत्त्व

खणाचं सौंदर्य त्याच्या बारकाव्यात आहे. लहान, नाजूक नक्षी, जणू मधाच्या पोळ्यासारखी रचना या कापडावर विणलेली असते, छापलेली नव्हे. गडद, दागिन्यां सारखे रंग एकमेकांत मिसळून एक सुंदर द्विरंगी नक्षीचा (brocade) प्रभाव निर्माण करतात. आणि त्यावर खास लालसर-जांभळा किंवा पिवळसर-हिरवा घाटदार किनारा खणाला एक सुरेख रेखीव ओळख देतो. इल्कल (ईरकल) साडी पासून प्रेरित झालेला गोमी, चिक्की परस, किंवा गायत्री काठ यामुळे खणाला एक वेगळंच सौंदर्य प्राप्त होतं.

पारंपरिकरित्या मऊसूत (mercerized) कापूस आणि रेशीम यांच्या मिश्रणातून तयार झालेलं हे नैसर्गिक कापड हलकं, आरामदायी (breathable), आणि टिकाऊ आहे. आजकाल त्यात पॉलिस्टर किंवा कृत्रिम रेशीम मिसळून अधिक स्वस्त टिकाऊ पर्यायही तयार केले जातात.

काही विणकर नैसर्गिक रंगांचा वापर करतात, तर काही शुद्ध रेशीम मिसळून खणाला अधिक समृद्ध रूप देतात, ज्यामुळे त्याची किंमतच नव्हे, तर त्यामागचं मूल्यही अधिक वाढते. आणि आता तर पेस्टल रंगांमध्ये किंवा बॉर्डर शिवायही खण विणले जात आहे. परंपरा आणि आधुनिकता यांचा हा आहे की नाही एक सुंदर संगम!

**उत्थान, पडझड... आणि पुनरागमन**

खणाबद्दल एक खास गोष्ट म्हणजे हे कापड मूळतः फक्त एका उद्देशासाठी तयार झालं होतं: साडीच्या ब्लाउजसाठी. पिढ्यानपिढ्या महिलांनी इलकल साडी सोबत खणाची चोळी परिधान करून एक पारंपरिक आणि देखणा लूक निर्माण केला. त्याची ३१ इंचांची रुंदी ही मर्यादा नव्हती, तर त्याची ओळख होती. जणू खणाला सुरुवातीपासूनच माहित होतं, त्याची भूमिका काय आहे.

पण काळ बदलला. स्वस्त आणि जलद (powerloom) तयार होणाऱ्या कापडांनी बाजार व्यापला, आणि हातमागावर विणल्या जाणाऱ्या खणाचं अस्तित्व धोक्यात आले, तरीही खण या सगळ्यात हरवून जायला तयार नव्हता.

खणाच्या या नव्या प्रवासाची गोष्ट सांगायची झाली, तर ती फक्त कापडाची नाही, तर त्याला नव्याने जिवंत करणाऱ्या लोकांची आहे. आज खण गावांच्या पलीकडे जाऊन जगभर पोहोचतोय, आणि त्यामागे अनेकांचे परिश्रम आहेत. अनेक उद्योजकांनी खणाला जागतिक स्तरावर नेण्याचं स्वप्न पाहिलं आणि ते साकार करण्यासाठी कपडे, ॲक्सेसरीज अशा विविध माध्यमांतून खणाला नव्या रूपात सादर केलं.

काही ब्रॅण्ड्स परंपरा आणि उपयोगिता यांचा संगम साधत खणाला आधुनिक हॅन्डक्राफ़्टेड बॅग्सच्या स्वरूपात विकतात. काही ब्रॅण्ड्स खणाला ड्रेस आणि फ्रॉकसारख्या नव्या फॅशनमध्ये रूपांतरित करतात, तर काही प्लॅटफॉर्म्स ग्राहकांना थेट कारागिरांशी जोडून अस्सल खण ग्राहकांपर्यंत पोहोचवतात. हे ब्रॅंड्स केवळ उत्पादने तयार करत नाहीत; ते परंपरा जपतात, विणकरांना आधार देतात आणि खणाला जागतिक मंचावर स्थान मिळवून देतात. या सगळ्या प्रयत्नांमुळे एक गोष्ट स्पष्ट होते—खण फक्त टिकून राहिला नाही, तर नव्याने फुलत आहे.

**एकच उद्देश—एकच ओळख ... खणाचं वेगळेपण**

जगात साड्यांचे असंख्य प्रकार आहेत, पण खण हे असं एकमेव कापड आहे जे खास करून फक्त ब्लाउज साठी विणलं गेलं. त्याची खासियत म्हणजे त्याचे दागिन्यांसारखे उठावदार रंग जे कॉटन किंवा सिल्क साड्यांशी सहज जुळून जातात. इतकंच नाही तर खण बहुपयोगी आहे. आज ते पुन्हा नव्या रूपात आपल्या समोर उभं आहे. डिझायनर्स आणि उद्योजकांनी त्याला नव्याने शोधले आहे. आज खण

फक्त पारंपरिक ब्लाउज पुरते मर्यादित राहिलेलं नाही, तर आता खणापासून परकर -पोलकं, स्लीव्हलेस ब्लाउज, रिव्हर्सिबल जॅकेट्स, ड्रेस, अगदी साड्याही तयार केल्या जातात.
आता ते बॅग्स, कुशन कव्हर्स, तोरणं आणि गिफ्ट पाउच अशा अनेक रूपांत दिसतंय. स्थानिकतेपासून जागतिकतेकडे त्याचा प्रवास सुरू आहे, पण मुळं मात्र तशीच घट्ट आहेत.

आजच्या फास्ट फॅशनच्या जगात, खण म्हणजे फक्त एक कापड नाही—तर reusable, up cycle आणि बहुउपयोगी (multi-purpose) असा एक विचार आहे. हळूहळू विणलेला, विचारपूर्वक तयार केलेला आणि अभिमानाने परिधान केला जाणारा खण हे ‘slow fashion’चं सुंदर उदाहरण आहे.


खणाची खरी ताकद म्हणजे त्याची जुळवून घेण्याची क्षमता. परंपरेची मुळं घट्ट धरून ठेवत, तो आधुनिकतेकडे सहजपणे वाटचाल करतो, कधी ब्लाउजमध्ये, कधी जॅकेटमध्ये, तर कधी घराच्या सजावटीसाठी.

एकेकाळी ओटीत ठेवला जाणारा छोटासा कापडाचा तुकडा आज जगभर प्रवास करतोय.

आणि तरीही ... त्याच्या प्रत्येक धाग्यात अजूनही घरचा गंध तसाच दरवळतो.

**पिढ्यांना जोडणारा धागा**

आज, नवरात्रीसाठी सामान भरताना, खणाचे ब्लाउज निवडताना, मला पुन्हा तेच बालपण आठवतं.
एक छोटासा प्रश्न - “खण म्हणजे काय?” आणि त्यातून उलगडलेली एक मोठी, सुंदर कथा.



*मी आणि माझी आई, शितलादेवी मंदिरात.*

पुढच्यावेळी खण कापड पाहिलंत - तर थोडा वेळ द्या. त्याच्या नक्षीला स्पर्श करा, त्या लहान तपशीलामध्ये दडलेल्या कथा अनुभवा. हातमाग, विणकर आणि अनेक पिढ्यांची परंपरा डोळ्यासमोर आणा.

कारण खण फक्त कापड नाही - ते आहे इतिहास, अर्ध्या मीटरमध्ये मोजलेला. ते आहे संस्कृती, रंगांच्या थरांमध्ये विणलेली, आणि नावाप्रमाणेच - थोडंसं गोड. ✨

- **कलिका केक्कार**

## अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख



**यश दामले** हा एक ध्येयवेडा आणि उत्साही तरुण असून, त्याने आपल्या आवडीप्रमाणे गोल्फ या क्रीडा क्षेत्राची वाट निवडली आहे. शिस्त, सातत्य आणि मेहनतीच्या जोरावर तो शिक्षण व खेळ यामध्ये उत्तम समतोल राखत आहे.

पारंपरिक करिअरच्या चौकटीबाहेर जाऊन, यश स्वतःची वेगळी ओळख घडवत आहे. या अपारंपरिक मार्गावर चालताना त्याला आई-वडिलांचा ठाम पाठिंबा आणि योग्य मार्गदर्शन लाभले आहे.

अनेक विद्यार्थी पारंपरिक मार्ग स्वीकारत असताना, यशचा प्रवास वेगळा आणि प्रेरणादायी ठरतो. त्याच्या या वाटचालीतून नव्या करिअरच्या शक्यता समोर येतात. त्याच्या या प्रवासाबद्दल अधिक जाणून घेऊया.

**यश, तू आम्हाला थोडक्यात स्वत:ची ओळख करून देशील का ?**

मी दिड वर्षाचा असताना, आई-वडिलांसोबत अमेरिकेतील फ्रीमॉन्ट येथे आलो. लहानपणापासूनच टीव्हीवर गोल्फचे सामने पाहताना या खेळाबद्दल अधिक जाणून घेण्याची आवड निर्माण झाली. वयाच्या सातव्या वर्षापासून मी गोल्फ खेळायला सुरुवात केली. माझे शिक्षण इर्विंग्टन हायस्कूलमध्ये झाले. हायस्कूलदरम्यान समर कॅम्पमध्ये कोच म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्याच वेळी माझ्या कोचने मला PGA Golf Management कोर्सबद्दल माहिती दिली. सध्या मी कोलोरॅडो स्प्रिंग्स युनिव्हर्सिटीमध्ये तिसऱ्या वर्षात PGA मॅनेजमेंट कोर्स करत आहे. बोस्टनमधील वेस्टर्न गोल्फ क्लबमध्ये इंटर्नशिप करणार आहे.

**तुझ्या आयुष्यात किंवा गोल्फमध्ये तुला सर्वाधिक प्रेरणा कोणाकडून मिळते?**

लहानपणापासून टीव्हीवर Tiger Woods आणि Akshay Bhatia यांसारख्या नामांकित गोल्फपटूंना खेळताना पाहून मला नेहमीच “आपणही असा खेळ खेळला पाहिजे” अशी प्रेरणा मिळत आली आहे. त्यामुळे माझ्या मनात गोल्फबद्दलची आवड खूप लवकर निर्माण झाली. जेव्हा माझे आई-वडील मला विचारायचे की तुला कोणता खेळ खेळायला आवडेल, तेव्हा माझे उत्तर नेहमीच

'गोल्फ' असेच असायचे. लहानपणापासूनची ही आवड आणि त्या खेळाडूंनी दिलेली प्रेरणा मला सतत प्रगती करण्यासाठी आणि माझ्या कौशल्यात अधिकाधिक सुधारणा करण्यासाठी प्रेरित करत राहते.

**तुझ्या support system मध्ये कोणकोण आहेत, आणि त्यांनी तुला या प्रवासात कशी मदत केली आहे?**

माझे आई-वडील हेच माझा खरा आधार आहेत. माझ्या आवडीची अचूक ओळख करून त्यांनी मला योग्य माहिती दिली आणि माझा निर्णय अधिक दृढ केला.

आजही प्रत्येक टप्प्यावर त्यांचा मोलाचा पाठिंबा आणि मार्गदर्शन मला सातत्याने मिळत आहे.

**तुझ्या गोल्फमधील प्रवासातले काही संस्मरणीय किंवा अभिमानाचे क्षण कोणते आहेत ?**


Pebble Beach Golf Links सारख्या जगप्रसिद्ध गोल्फ कोर्सवर  खेळायला मिळणे हे अनेक गोल्फपटूंच्या आयुष्यातील एक मोठं स्वप्न असतं. हायस्कूलच्या शेवटच्या वर्षाला असताना मला ती संधी मिळाली .

याच बरोबर हायस्कूल मध्ये असताना व्हर्सिटी गोल्फ टीमचा कॅप्टन होण्याची पण संधी मिळाली.

**जर गोल्फ खेळत नसतास , तर तू दुसरा कोणता खेळ किंवा छंद निवडला असतास  असता असे तुला वाटते? आणि का?**

मला सर्वच खेळ आवडतात, पण जर मी गोल्फ खेळत नसतो, तर कदाचित मी बास्केटबॉल किंवा फुटबॉल हा खेळ निवडला असता. त्याच वेळी, माझ्या भविष्यासाठी मी इंडियाना येथे जाऊन फायनान्समध्ये शिक्षण घेण्याचाही विचार करत होतो.

**गोल्फने तुला शिस्त, संयम किंवा आव्हानांना सामोरे जाण्याबाबत काय शिकवले आहे?**



गोल्फ खेळात संयमाला खूप महत्त्व आहे. साधारणपणे १८ होल्स पूर्ण करण्यासाठी सुमारे ७५ शॉट्स लागतात. एखादा शॉट अपेक्षेप्रमाणे न झाल्यास त्याचा जास्त काळ विचार न करता, फक्त १०–१५ सेकंदांत तो मनातून बाजूला ठेवून पुढील शॉटवर पूर्ण लक्ष केंद्रित करणे आवश्यक असते. ही सवय अंगीकारणे म्हणजेच खरी शिस्त.

तसेच, गोल्फमध्ये लवचिकताही तितकीच महत्त्वाची असते. योग्य स्विंगसाठी कंबर आणि पायांमध्ये योग्य लवचिकता आवश्यक असते. त्यासाठी मी नियमित व्यायाम करतो आणि जिमलाही जातो. या खेळाने मला शिकवले आहे की केवळ ताकद पुरेशी नसते, तर संयम, सातत्य आणि लवचिकता यांचा योग्य समतोल साधणे अधिक महत्त्वाचे असते.

**तुझा नेहमीचा दिवस कसा असतो?**

माझ्या वर्गांच्या वेळा दररोज बदलत असल्यामुळे मला दिवसाची आखणी त्यानुसार करावी लागते. साधारणपणे वर्गांमधील मोकळ्या वेळेत, सकाळी सुमारे ११ वाजता मी जिमला जातो. त्यानंतर दुपारी ४ वाजता, हवामान अनुकूल असल्यास, मी ड्रायव्हिंग रेंजवर सरावासाठी जातो. त्यानंतर घरी परतल्यानंतर मी गृहपाठ पूर्ण करतो आणि थोडा वेळ मित्रांसोबत घालवतो, असा माझा साधारण दिनक्रम असतो.

मला विशेष आवडणारी गोष्ट म्हणजे प्रत्येक शुक्रवारी आमच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून टूर्नामेंट आयोजित केली जाते. ही दिनचर्या मला शिस्तबद्ध, सक्रिय आणि संतुलित राहण्यास मदत करते.

**तुझे शाळेतील आवडते विषय कोणते आहेत, आणि तुला ते का आवडतात?**

मला Information Science हा विषय विशेष आवडतो. या विषयात Power BI चा वापर करून डेटा visualize करणे, विविध प्रकारचे charts आणि interactive dashboards तयार करणे मी शिकलो आहे. Power BI च्या मदतीने Excel किंवा database मधील डेटा एकत्र करून त्याचे analysis करता येते आणि त्यातून उपयुक्त insights मिळवता येतात. Bar chart, pie chart, line graph यांसारख्या visuals मुळे डेटा सहज समजतो आणि trends स्पष्टपणे दिसतात. तसेच filters आणि slicers वापरून विशिष्ट माहितीवर लक्ष केंद्रित करता येते. या सगळ्या प्रक्रियेमुळे डेटा analysis अधिक सोपा आणि रंजक वाटतो, आणि योग्य निर्णय घेण्यासाठी त्याचा उपयोग करता येतो.

**तू पुढे काय करायचे ठरवले आहेस ?**

PGA of America च्या युनिव्हर्सिटी प्रोग्रामनंतर मला एखाद्या प्रायव्हेट कंट्री क्लबमध्ये Assistant Professional म्हणून काम करायचे आहे.

त्या ठिकाणचे शांत आणि खाजगी  वातावरण मला विशेष आवडते, तिथे  नियमित येणाऱ्या सदस्यांशी ओळख निर्माण करून त्यांच्याशी चांगले  व्यावसायिक संबंध (नेटवर्किंग) प्रस्थापित करता येतात.

भविष्यात, मला Director किंवा General Manager या पदांपर्यंत पोहोचण्याची इच्छा आहे, जिथे संपूर्ण क्लबच्या ऑपरेशन्सची जबाबदारी सांभाळता येईल आणि व्यवस्थापनाचा व्यापक अनुभव मिळेल. त्याचबरोबर, स्वतःचा खेळ सुरू ठेवणे आणि सातत्याने माझ्या गोल्फ कौशल्यात सुधारणा करणे हेही माझ्यासाठी तितकेच महत्त्वाचे आहे.माझ्या गोल्फ क्षमतांमध्ये सातत्याने सुधारणा करणे हे माझ्यासाठीही खूप महत्त्वाचे आहे.

**शाळेत आणि खेळात दोन्ही ठिकाणी यश मिळवू इच्छिणाऱ्या तुझ्या वयाच्या इतर मुलांना तू काय सल्ला देशील?**

प्रत्येकाने सर्वप्रथम आपली खरी आवड शोधणे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि त्याच क्षेत्राला आपल्या करिअरचे स्वरूप देण्याचा प्रयत्न करावा. या प्रक्रियेत तुमच्या आयुष्यातील काही वर्षे, कदाचित चार वर्षेही, शोध, प्रयोग आणि शिकण्यात गेली तरी त्यात काहीही गैर नाही. कारण एकदा तुम्हाला तुमची खरी आवड सापडली की, त्यावर काम करताना मिळणारा आनंद आणि समाधान काही वेगळेच असते. हेच माझे आई-वडीलही नेहमी मला सांगतात.

अशा प्रेरणादायी प्रवासातील अनुभव इतरांनाही उपयोगी पडावेत यासाठी यशचे आई-वडील मार्गदर्शन आणि मदत करण्यासही तयार आहेत. अधिक माहितीसाठी खाली दिलेल्या लिंकचा वापर करू शकता.

https://www.pga.com/workingolf/associate-program?srsltid=AfmBOoo0erojXhaMDJl36nqvXqe4skkRFNeH8kPb2_MRyB9E7MfxLC3P

Link for a video from the PGA:

https://youtu.be/emG658E1-m4?si=cgaSTOgvk6X1-HHY

- **शब्दांकन: उत्तरा भालेराव,** टँपा, फ्लोरिडा




## पिसारा की पसारा

आपल्या प्रत्येकाच्या मनात एक हौशी बालक दडलेले असत. त्या बालकात नवनवीन गोष्टी घेऊन त्यांचा आनंद घेण्याची वृत्ती असते. तो पिसारा आपण मोठ्या रसिकतेने आणि रुबाबात मिरवत असतो. आणि त्या त्या वयात अशी हौस मौज केलीच पाहिजे ! नाही का ?

त्या पिसाऱ्याचा पसारा कधी होतो ते समजत देखील नाही आणि पाहता पहाता घर भरून जातं.

अमेरिकेत तर पसारा करणे अगदी सोप्प.

एका कंपनीचा एक विनोद सांगतात. तिथे प्रत्येकजण एका कागदाच्या दहा प्रती काढत असे.

का ? तर एक तुला , एक मला आणि आठ आपल्या लागल्या कधी तर ! Just in case !

जेव्हा आपल्याला आपण मांडून ठेवलेल्या पिसाऱ्याचा भार झेपत नाही त्या वेळेच्या आपलं घर असंख्य वस्तूंनी भरून जातं

१. मोठ्या घरातून लहान घरात जाण्याची परिस्थती याला इंग्रजीत "डाऊन सायझिंग" म्हणतात. घराचं लहानीकरण! त्याला "स्मार्ट साईजिंग" म्हणू या.

२. त्यासाठी पसारा आवरणे म्हणजे इंग्रजीत त्याला "डी क्लटरिंग" म्हणतात. .

३. तो प्रपंच पसारा आवरून नुसते घर बदलायचे नसते, तर त्यासाठी आपली जीवनशैली म्हणजे बदलण्याची वेळ असते. नुसत्या वस्तू नाहीत तर भावनिक गोतावळासुद्धा दूर करण्याची वेळ असते.

'डाऊन सायझिंग, डी क्लटरिंग आणि लाइफ स्टाईल चेंज' हे एकमेकांत गुंतलेले आहेत.

**या विषयावर उत्तररंगमध्ये नुकताच एक परिसंवाद झाला. पण हा विषय आपल्या जिव्हाळ्याचा आहे, म्हणून हा लेखन प्रपंच.**

हे सर्व होते कसे ? तर आपल्या आयुष्याच्या पूर्वरंगात आपण अमेरिकेत मोठी मोठी घर घेऊ लागतो. भारतातून अनेक वस्तू आणतो. पुस्तक, कॅसेट्स, नाना परीची भांडी, ओसंडून वाहणारे कपडेपट, देशोदेशीच्या तुळशीबागेतून आणलेल्या 'ज्याला मी क्युट लिटिल यूसलेस थिंग्स' म्हणते त्या वस्तू, मुलांनी गराज मध्ये आणून टाकलेलं... म्हणजे आपण इन्हेरिट केलेलं त्यांचं सामान. मग लोकांना बोलावून समारंभ करतो, पार्ट्या करतो, आयुष्याच्या उत्तररंगात या सगळ्याच ओझं झेपत नाही तेव्हा मग लहान घरात जायची वेळ येते. हे करताना नुसतं आपल्या घरातून समोरच्या लहान घरात जायचं नसत. तर आपल्याला कोणत्या प्रकारच्या घरात जायचं, कोणत्या वसाहतीत

जायचं, याचे काही निर्णय घ्यायचे असतात. ते सोपे नसतात. यासाठी आपल्याला विविध प्रकारच्या निवृत्त वसाहतींची माहिती घ्यावी लागते. तेव्हा हा जीवनशैलीचा विषय सुद्धा खूप मोठा आहे. या लेखात फक्त पसारा आवरणे याबद्दल लिहीत आहे. ज्यांनी हा परिसंवाद सादर केला, ते काही सॉल्व्हेशन आर्मी नाही की सोल्युशन आर्मी नाहीत . पण या परिसंवादामुळे श्रोत्यांच्या मनामध्ये काही विचार यावेत, चिंतन व्हावं, जाणीव जागृती व्हावी असा हेतू होता.

पसारा आवरताना 'निर्ममत्व' म्हणजे डीटॅचमेंट हा शब्द लक्षात ठेवावा. अष्टांगयोगात अपरिग्रह हे एक योगाच अंग आहे. या शब्दाचा अर्थ मला माझ्या पंधरा वर्षाच्या भाच्याने शिकवला. त्याच्यासाठी बॅगपॅक घेताना एकाच्या किमतीत दोन आली. मी दोन्ही त्याला देऊ लागले. तेव्हा तो म्हणाला," मावशी मी एका वेळी एकच वापरणार ना! मग दोन कशाला ? " माझे डोळे खाड्कन उघडले !

**पसारा आवरणे का कठीण होते ? काही कारणे:**

१. ज्या गोष्टीत भावनिक गुंतवणूक असते, त्यांचा त्याग करणे कठीण. एखाद्या गोष्टीमुळे आपल्याला एकेकाळी सुख आणि समाधान दिलेले असत. मी निवृत्त झाल्यावर सहा वर्षे माझी मॅन्युअल्स आणि टिपणे जपून ठेवली होती. " जस्ट इन केस" ! कधीकधी टाकल्यावर दुसऱ्या दिवशी नेमकी ती वस्तू लागते, असे अनुभव असतात, म्हणून आपण टाकत नाही.

२. काही वस्तू आपल्या जिवलगांच्या असतात, तेव्हा त्यातली गुंतवणूक आपल्या स्वत्वाशी झालेली असते.. आपले व्यक्तिमत्व जणू त्या वस्तूबरोबर गुंफलेले असते. त्यामुळे त्या वस्तू टाकून देणे म्हणजे आपल्याच आयुष्यातला एक अध्याय संपतो आहे अशी भावना होते. विशेषतः वृद्ध लोकांना वस्तू टाकून देण्यास अडचण येते.

३. काहींना भीती वाटते की वस्तुंबरोबर त्याच्याशी जोडल्या गेलेल्या आठवणी आणि माणसांच्या आठवणी पुसल्या जातील. पण स्मृती या आत असतात, वस्तूत नसतात हे समजून घेणे महत्वाचे आहे.

४. हे काम किचकट, वेळखाऊ असते. काही निर्णय घ्यावे लागतात, त्याची आपण टाळाटाळ करत बसतो.

५. काय ठेवायचं आणि काय कमी महत्वाचं याबद्दल घरातील माणसात दुमत असते. कोणाला लोणची टाकवत नाहीत तर कोणाला पुस्तक! त्यामुळे मग वादग्रस्त गोष्टी तशाच पडून रहातात.

६. आनंद चित्रपटात एक वाक्य आहे," बीता हुआ कल आज हमारे बीचमे क्यों आता है? क्योंकी आजको हम पूरी तरहसे जीत नाही सकते!" हे एक विचार करण्यासारखं कारण आहे .

**पसारा आवरण्यासाठी काही अनुभवाचे बोल:**

१. तुम्हाला साठवळा (म्हणजे साठवलेल्या गोष्टी) का कमी करायचा आहे, या प्रश्नाच उत्तर शोधा. उत्तरानुसार काय ठेवायचं आणि काय टाकायचं याचे मार्ग सापडतील.

२. एक कालमर्यादा घालून घ्या आणि ती पाळण्यासाठी रोज थोडे थोडे करत सातत्याने काम करा.

३. आपले मन कमी गुंतले असेल अशा ठिकाणापासून सुरवात करा आणि टाकण्याच्या वस्तूंचे वर्गीकरण करा. उदा: बाथरूम पासून सुरवात करावी. सर्वात अवघड भाग असतो आपली शयनगृहे आणि तिथले कपडेपट ! साठवणीची कपाटे आपल्या विविध आकाराच्या आणि प्रकारच्या आवृत्त्यानी तुडुंब भरलेली असतात. तिथे आठवणींचा सुगंध रेंगाळत असतो. ऋतूंचे सोहळे प्रदर्शन मांडून बसलेले असतात. इथेच भावना आपला टाकता हात पकडून 'नको ना' म्हणत आर्जव करू लागतात. तुमच्या कपड्यातले कोणते तुम्हाला आता होतात आणि कोणते सध्या फॅशन मध्ये आहेत? तेवढेच ठेवा आणि बाकीचे खरंच जाऊदे. देऊन टाका.

४. टाकण्याचे काम सुरु केले तरी वस्तू वाट अडवून बसतात. अशा वेळी

ती वस्तू हातात धरा आणि दोन प्रश्न विचारा :

अ : ही हातात धरली तर मनात काय विचार येतो ?

ब: ही टाकून दिली तर काय होईल ?

५. देऊन टाकणे याचे वेगवेगळे मार्ग असतात. आम्ही मोठे घर सोडून लहान घरात जायचे ठरवले, तेव्हा मराठी मंडळात जाहिरात दिली, " अमुक एक दिवशी आमचे घर मुक्त द्वार असेल. त्या दिवशी घरी या, आणि घरातील तुम्हाला काय काय आवडले असेल ते घेऊन जा". आज केव्हाही मराठी मित्रांकडे गेले की आपल्या आंजारून गोंजारून ठेवलेल्या वस्तू त्यांच्याकडे सुखाने नांदताना दिसतात आणि पुनर्भेटीचा आनंद मिळतो.

६. विक्रीचे विविध मार्ग असतात. इस्टेट सेल करणाऱ्या कंपन्या असतात, पण निवड काळजीपूर्वक करा. फसवणूक होऊ शकते.

७. काही गोष्टी डिजिटल करून ठेवता येतात.

८. सोन्याचांदीच्या वस्तू, मुलांना नको असतील तर भारतात पाठवून तिथे विकणे आणि एखाद्या संस्थेला ते पैसे दान करणे याचा विचार करावा.

१०. देवमूर्तीसाठी मराठी मंडळांनी किंवा मंदिरांनी संग्रहालये करणे हाच उपाय आहे. त्यांचे विसर्जन करणे हे अवघड असू शकते.

लाईफ स्टाईल चेंज हे भावनिक स्थित्यंतर असत. Loss of relationship with things, people and memories! गेल शीहीच एक पुस्तक आहे..' पॅसेजेस!'

आगगाडीच्या दोन डब्याना जोडणारे हे डुगडुगते पॅसेजेस .. आयुष्य तसंच असतं. मागचं दिसत असत आणि पुढचं सुद्धा . मध्ये तो अस्थिर डुगडुगणारा पॅसेज असतो. तो पार करायचा असतो आणि एकदा पुढच्या डब्यात गेलं की मागे वळून पाहायचं नसत. आणि मुख्य म्हणजे हे सर्व विचारपूर्वक करावं. आपल्याला काय पाहिजे, आपल्याला कुठे रहायचं, आपल्याला कस रहायचं आहे ?

मुलांचा विचार नक्कीच घेतला पाहिजे. पण निर्णय मात्र स्वतः:चा असावा . माझी एक मैत्रीण सांगे, ”कोणताही निर्णय जेव्हा स्वतः:च्या बुद्धीने होतो तेव्हा त्यात अशांती, स्वतः:वर चिडणे किंवा जगावर चिडणे असत नाही. असते फक्त न ढळणारी प्रसन्नता आणि समाधान. “

- **विद्या हर्डीकर सप्रे**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## साठवण

मांडून ठेविला मी हा केवढा पसारा
बघ चूल बोळकी ही, बघ ग्रंथभार सारा
हिंडून देश नवखे भांडार साठविले
शिल्पे जुनी पुराणी, हौसेस ना किनारा

या सर्व संग्रहाचे मजलाच रे महत्व
दुसऱ्या कुणास याचे नाही मुळीच मोल
प्रत्येक वस्तूसंगे स्मृति दाट गुंफलेल्या
अस्तित्व येथ त्यांचे देते मनास ऊब

पुसतोस आज मजला का जमवितेस सारे
जड विश्व सर्व मिथ्या मी जाणते कधीचे
द्रुष्टीस सुखविती या वस्तु सभोवतीच्या
त्या मागती न काही ना टाकती उसासे

होईन वृद्ध जेव्हा उरतील ना सुहृद
देईल साथ मजसी जो जमविला प्रपंच
मग भूतकाळ माझा माझ्यासवे सरेल
इतिहास हा जमेचा शून्यामधे विरेल

- **रजनी शेंदुरे,** सिएटल

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## प्रवास वीणा वर्ल्डचा



आज आपल्या सर्वांच्या जिव्हाळ्याच्या ‘वीणा वर्ल्ड’ला तेरा वर्षे पूर्ण होत आहेत, ही केवळ एक वर्षगाठ नाही तर असंख्य स्वप्नांना पंख देणाऱ्या प्रवासाची भावपूर्ण कहाणी आहे. वीणा वर्ल्ड म्हणजे केवळ एक पर्यटन संस्था नाही, तर ती प्रत्येक प्रवाशाच्या मनातील “एकदा तरी देश-विदेश फिरावे” या स्वप्नाची साकार प्रतिमा आहे. आपल्या उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि ग्राहकांप्रती असलेल्या आत्मीयतेमुळे या संस्थेने अल्पावधीतच पर्यटकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे. या यशस्वी प्रवासामागे संस्था प्रमुख विणाताई पाटील यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, संवेदनशील विचारसरणी आणि कष्टाळू वृत्ती आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वीणा वर्ल्डने केवळ व्यवसायिक उंची गाठली नाही, तर “माणुसकी” जपणारी संस्था म्हणूनही वेगळी ओळख निर्माण केली आहे. कोरोनासारख्या अभूतपूर्व संकटाच्या काळात अनेक संस्था डगमगत असताना, वीणा वर्ल्डने मात्र आपली माणुसकी जपली. पर्यटन पूर्णपणे ठप्प असतानाही कर्मचाऱ्यांची आणि त्यांच्या कुटुंबीयांची घेतलेली काळजी ही केवळ व्यवस्थापन नव्हे, तर एक कुटुंबप्रमुख म्हणून घेतलेली जबाबदारी होती. हीच वीणा वर्ल्डची खरी ओळख आहे. ‘वीणा’ हे नावच आपल्या संस्कृतीची आणि सुरेलतेची जाणीव करून देते. सरस्वती मातेच्या हातातील वीणेप्रमाणेच, या संस्थेनेही लाखो प्रवाशांच्या आयुष्यात आनंदाचे सूर छेडले आहेत. प्रत्येक कर्मचाऱ्याशी जिव्हाळ्याने संवाद साधणे, त्यांच्या कुटुंबाची चौकशी करणे—ही केवळ औपचारिकता नसून एक सशक्त, संवेदनशील संस्कार आहे. आजपर्यंत महाराष्ट्रातील लाखो पर्यटकांनी वीणा वर्ल्डच्या माध्यमातून आपल्या प्रवासाची स्वप्ने पूर्ण केली आहेत. भारतातील विविध स्थळांपासून ते जगभरातील नामांकित पर्यटनस्थळांपर्यंत, प्रत्येक प्रवास हा आठवणींचा खजिना बनविण्याचे कार्य या संस्थेने अत्यंत यशस्वीपणे केले आहे. तेरा वर्षांचा हा प्रवास अत्यंत गौरवास्पद आहे. या प्रवासात निर्माण झालेला विश्वास, जपलेली माणुसकी आणि दिलेली आनंदाची अनुभूती हीच खरी वीणा वर्ल्डची संपत्ती आहे. या यशस्वी वाटचालीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन! येणाऱ्या काळातही वीणा वर्ल्ड अशीच प्रगती करत राहो, अधिकाधिक स्वप्ने साकार करो आणि प्रत्येकाच्या जीवनात आनंदाचे नवे क्षण निर्माण करो—हीच मनापासून शुभेच्छा. आपला

- **अमय नागवेकर**


Among India's Most Admired Travel Brands
Veena World
Now in the USA
Now in Novi, Michigan
Introducing Veena World's
Official Travel Affiliate
SWAMI Tours and Travels
Novi, Michigan, USA
Ms. Prachi Athavale
+1 248 980 3736
ta.swamitoursandtravels@veenaworld.com
The world of Veena World is now open to Indian families across the USA through our growing network of Official Travel Affiliates. Wherever you want to go - from Antarctica to Australia, from Italy to Iceland, from Jaipur to Japan... we are here to guide you with care, clarity, commitment and a trusted tour manager by your side.
What's now available across the USA with Veena World Inc.?
• Group Tours • India Inbound Tours and Packages
• Customized Holidays • Corporate Travel (MICE)
• Women's Special Tours • Seniors' Special Tours
Why Families Choose Veena World?
• Expert Indian Tour Manager
• Delicious Indian Meals
• Carefully Curated Itineraries
• Family-friendly Experience
• Affordable Packages
• 24/7 Assistance & Support
Chalo,Bag Bharo, Nikal Pado with Veena World... Around the World!
900,000+ happy guests | 70,000+ tours completed | 1,100+ strong team
Novi, Michigan +1 248 980 3736
Veena World Inc. +1 903 648 5240
usa@veenaworld.com I veenaworld.com
VEENA WORLD
Travel. Explore. Celebrate Life.

## आनंदाचे देणे



आनंदाचे देणे या लेखमालेत मागील लेखात आपण आपल्या वाट्याला आलेल्या कामातून आनंद घेण्यासाठी आणि इतरांना आनंद देण्यासाठी नेमके काय करायचे याबाबत जाणून घेतले. या लेखात ही संकल्पना अधिक सविस्तरपणे जाणून घेऊ या...

माणसाला जीवनात उत्कर्ष हवा असतो. पण उत्कर्षासाठी कामात ‘कौशल्य’ येणे खूप गरजेचे आहे. करायचे म्हणून कसेतरी काम करणे आणि कौशल्याने काम करणे यात खूप फरक आहे. कौशल्याचा संबंध गुणवत्तेशी असतो. कमीत कमी वेळात, जास्तीत जास्त कौशल्यपूर्वक काम करणे म्हणजे गुणवत्तापूर्वक काम करणे. याचाच अर्थ कामाचा दर्जा सुधारण्यासाठी कामात कौशल्य येणे खूप गरजेचे आहे. कौशल्य मिळविण्यासाठी माणसाकडे ज्ञानपिपासू वृत्ती असणे गरजेचे आहे. जी माणसे आपल्या कामाबाबत आधिकाधिक ज्ञान मिळवितात त्यांची नेहमी प्रगती होते. यासाठीच तुम्ही ज्या क्षेत्रात काम करता त्या क्षेत्रातील ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्याचा प्रयत्न करा. कारण त्याशिवाय कामातील कौशल्य विकसित होत नाही.

बरेच लोक काम करण्यासाठी प्रचंड मेहनत घेतात पण त्या सर्वांची प्रगती होतेच असे नाही. आपले प्रमोशन व्हावे आणि कामाच्या ठिकाणी आपल्याला नवनवीन रोल मिळावे अशी सर्वांची अपेक्षा असते. तसे घडण्यासाठी कामात काहीतरी वेगळेपण येणे तितकेच गरजेचे आहे. कामात प्राविण्य मिळविण्यासाठी कौशल्याने काम केल्याने अधिक फायदा होतो. कारण कौशल्याने तुमच्या कामाची गुणवत्ता वाढते.

त्याचप्रमाणे कामात कौशल्य मिळविण्यासाठी एकाग्रचित्ताने, तन्मयतेने आणि आवडीने काम करणे देखील गरजेचे आहे. कौशल्याचा संबंध बऱ्याच अंशी आपल्या अंतर्मनाशी येत असतो. असे म्हटले जाते की, ‘Habit is the function of subconscious mind’. एकदा तुम्हाला लक्ष देवून, तन्मयतेने काम करण्याची सवय लागली की पुढे त्या कामाचा ताबा तुमचे अंतर्मन घेते. याचाच अर्थ तुमचे नेहमीचे काम तुमच्याकडून पूर्वीपेक्षा अधिक वेगाने आणि अगदी सहज होऊ लागते. कारण अंतर्मनाकडे सहजता आणि अचूकता आहे. या सहजतेतूनच तुम्हाला कामातील कौशल्य साध्य होते. कामावर तुमची उत्तम पकड बसते. कालांतराने कामात तुम्हाला फार लक्ष घालावे लागत नाही. कारण ते काम तुमच्या अंतर्मनाकडून सहज आणि अचूकतेने होऊ लागते. समजा तुम्हाला एखादे काम करण्यासाठी एक तास लागत असेल तर पुढे पुढे ते काम तुम्ही अर्धा तासातही सहज पूर्ण करू शकता.

ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू ब्रॅडमन याचा आज सर्वश्रेष्ट फलंदाज आणि उत्तम कॅप्टन म्हणून नावलौकिक आहे. असं म्हणतात की, ब्रॅडमन एक स्वयंसिद्ध क्रिकेटपटू आहे. कारण त्याने स्वतः सराव करून क्रिकेटचे तंत्र आत्मसात केले. पण फार कमी लोकांना हे माहीत आहे की, सुरुवातीच्या काळात ब्रॅडमन न थकता फक्त स्टंपने फलंदाजीचा सराव करीत असे. कारण जो स्टंपने फलंदाजी करु शकतो तो बॅटने सहज फलंदाजी करू शकतो. स्टंपवर खेळणे बॅटने खेळण्यापेक्षा फार कठीण असते. सुरुवातीला केलेल्या या अथक सरावाचा भविष्यात त्याला खूप फायदा झाला. कारण या सरावातून त्याच्याकडे सहजता आणि अचूकता आली. ज्यामुळे बॉल ब्रॅडमनच्या कधीच दृष्टीआड झाला नाही. त्याची फलंदाजीवर उत्तम पकड बसली. तो कोणत्याही प्रकारच्या गोलंदाजीला घाबरत नसे. बॉल कसा येणार आणि तो कशी बॅटिंग करणार याचे आधीच त्याच्या मनात निरनिराळे आराखडे बांधलेले असायचे. बॉलरने जरी बॉलिंग करण्याची पद्धत बदलली तरी त्याची फटकेबाजी कधीच चूकत नसे. त्याच्या याच रणनितीमुळे त्याला फलंदाजीत अमाप यश प्राप्त करता आले. थोडक्यात एकच काम सातत्याने केल्याने कामातील गती वाढते, त्या कामात सहजता आणि अचूकता निर्माण होते. ज्यातून त्या कामातील कौशल्य विकसित होत जाते.

पण कधी कधी तेच तेच काम पुन्हा पुन्हा केल्याने कालांतराने त्या कामातील रस कमी होण्याची शक्यता असते. अशावेळी कामात आलेली सहजता कधी कधी प्रगतीत बाधा ठरू शकते. म्हणूनच कामात सहजता आल्यावर आपले काम अधिक चांगले कसे करता येईल याकडे लक्ष द्यायला हवे. कामातील कौशल्य वाढविण्यासाठी त्याबाबतचे ज्ञान सतत अपडेट करायला हवे. कारण काळानुसार जगात अनेक बदल होत असतात. तंत्रज्ञानात बदल होतात. काम करण्याच्या पद्धती अपडेट होत जातात. जसे की, सध्याचे जग आधुनिक तंत्रज्ञानाचे आहे. आता एआयने सर्वच क्षेत्रात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. त्यामुळे जवळजवळ सर्वच कामे अधिक वेगाने केली जात आहेत. तंत्रज्ञानात वेगाने होण्याऱ्या प्रगतीमुळे काम वेगाने करण्याला आज जास्त प्राधान्य आहे. अशावेळी या नवनवीन

तंत्रज्ञानाशी आपल्याला मैत्री करता यायला हवी. ते तंत्रज्ञान जाणून त्यानुसार कामात वेळोवेळी बदल करता यायला हवेत. अधिक ज्ञान मिळविण्यासाठी त्याबाबत विविध कोर्सेस वेळोवेळी करायला हवेत. ज्यामुळे ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात आणि कामात प्राविण्य येते.

आजच्या आधुनिक काळात तुमच्या जवळ फक्त त्या कामासंबंधित एखादी मोठी पदवी असून भागत नाही. त्या कामाबाबत असलेले अद्ययावत आणि काळानुरुप बदलणारे ज्ञानदेखील सतत मिळवत राहावे लागते. कोणत्याही वयात आज ज्ञान मिळविण्याशिवाय तुमच्याकडे पर्याय नाही. ज्ञान सतत अपडेट केल्याने आणि त्यानुसार कामाच्या पद्धतीमध्ये नाविण्यपूर्ण बदल केल्यामुळे कामातील कौशल्य सहज आत्मसात करता येते.

कामात प्रगती करण्यासाठी कौशल्यासोबतच ‘कल्पकता’ही खूप महत्त्वाची आहे. माणसाच्या संपूर्ण जीवनातच कल्पकतेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ‘कल्पकता ही एक दुर्मिळ गोष्ट आहे. काही विशिष्ट लोकांनाच निसर्गाकडून कल्पकतेचे वरदान जन्मतःच मिळते.’ असा काहींचा समज असतो. वास्तविक कल्पकतेने जे काम करतात ते आयुष्यात टॉपला जातात. टॉप पोझिशनवर फार कमी लोक असतात कारण इतर लोक स्वतःजवळ असलेल्या कल्पकतेचा वापर करीत नाहीत. याचाच अर्थ असा की, कल्पकता प्रयत्नपूर्वक कोणीही साध्य करू शकते.

कल्पकता साध्य करण्यासाठी आपल्या कामाबद्दल संपूर्ण ज्ञान मिळवायला हवे. मिळवलेल्या ज्ञानावर सखोल चिंतन करायला हवे. कारण या चिंतनातूनच कल्पकता उदयाला येते. इन्ट्यूशनचा संबंध अंतर्मनाशी असतो. एखाद्या गोष्टीचा सतत विचार करणे म्हणजे चिंतन आणि या चिंतनातून इन्ट्यूशन जागृत होते. चिंतनातून नवनवीन शोध लागतात. स्वतःमध्ये अशी इन्ट्यूशन जागृत करण्यासाठी आपल्या कामाबद्दल सर्व बाजूने चिंतन करण्याची सवय लावायला हवी. काम करताना एखादी अडचण येत असेल तर ते काम करण्याच्या पद्धतीमध्ये थोडा बदल करायला हवा. कारण कामात सुधारणा केल्याने तुम्हाला अंर्तमन योग्य मार्ग सूचवते आणि तुमचे काम सहज आणि सोपे होते.  कामात कल्पकता आणण्यासाठी कामात सातत्याने सुधारणा (Continuous Improvement) करणे देखील तितकेच गरजेचे आहे.  जपानमध्ये या संकल्पनेला कायझेन (Kaizen) असे म्हणतात. Kai म्हणजे बदल आणि zen म्हणजे चांगले. एखाद्या कामात सूक्ष्म आणि हळूवार बदल करून अधिक चांगले आणि लक्षणीय परिणाम साध्य करता येतात.

साधे उदाहरण देतो पूर्वीचे कंप्युटर एका मोठ्या खोलीत मावतील एवढे अवाढव्य होते. पण आता तोच कंप्युटर आपल्या तळहातावरच्या एका मोबाईमध्ये समाविष्ट झालेला आहे. मोठ्या आकारामुळे पूर्वी कंप्युटर एका ठिकाणाहून दुसरीकडे नेणे शक्य नव्हते. पण आता आपण आपल्या खिशातूनही तो सहज कुठेही घेऊन जावू शकतो. तंत्रज्ञानामध्ये एवढा मोठा बदल निर्माण करण्यासाठी अनेक लोकांची कल्पकता आजवर कामी आलेली आहे. सुरुवातीला कदाचित या कल्पकतेला लोकांनी वेड्यात काढले गेले असेल पण आज तीच कल्पकता सर्वांना सुखसुविधा उपलब्ध करण्यासाठी कारणीभूत ठरत आहे. जगात आजवर झालेले नवनवीन बदल हे देखील कल्पकतेचीच फळे आहेत.

अशा प्रकारे कौशल्य आणि कल्पकतेने काम करून तुम्ही तुमच्या कामातून आनंद मिळवू शकता आणि चांगले काम करुन इतरांना आनंद देऊ शकता.

\- **प्रल्हाद वामनराव पै,** आजीव विश्वस्त, जीवनविद्या मिशन

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## वेद, गीता की ज्ञानेश्वरी?

श्री ज्ञानेश्वरांनी गीतेतल्या अठराव्या अध्यायांमधील ६६ व्या श्लोकाचे विश्लेषण, ९५ ओव्या वापरुन विलक्षण पद्धतीने केले आहे. सुरुवातीला पूर्णपणे शरण जाण्याचा उपदेश दिला आहे, ज्याच्यामुळे मुमुक्षाला सर्व पापांपासून मुक्ती मिळते. पाण्यामध्ये जसे मीठ विरघळते तशी साधकाची शरणागती असावी हे आपल्याला माउलींनी शिकवले आहे. आणि त्याच्यानंतर (ज्ञानेश्वरीतल्या १४२५व्या ओवीपासून) माउलींनी, गीतेचे महत्व किती व कसे हेही दाखवून दिले आहे.

**वेद -** खरं म्हटलं तर वेद आधी अस्तित्वात आले आणि श्रीभगवद्गीता त्यानंतर हजार वर्षांनी लिहिली गेली. पण वस्तुस्तिथी अशी आहे की वेदांचा सारांश गीतेमध्ये वेगवेगळ्या अध्यायांतून पसरलेला आहे. शिवाय गीतेचे विशेष महत्व म्हणजे स्वतः श्रीकृष्णानी त्यांच्या वाचेतून आपल्याला गीताशास्त्र उपलब्ध करून दिले आहे. गीतेच्या पोटी वेद लपले आहेत हा महत्वाचा मुद्दा आहे. माउलींना आपल्या श्रोत्यांना (सामान्य माणसाला) हे दाखवून द्यायचे होते की गीतेचे ज्ञान हे वेदाभ्यासाइतकेच परिपूर्ण आहे. वृक्ष जसा बीजामध्ये सूक्ष्म रुपात अस्तित्वात असतो, तसाच वेदांचा अर्क गीतेमध्ये रुजलेला आहे ज्यामुळे सामान्य माणसाला ज्ञानमार्गाने मोक्षापर्यंत पोहोचता येते.

**गीता -** श्रीभगवद्गीता हा संस्कृत भाषेतील काव्यग्रंथ असून वेदांपेक्षा जास्त उदार मतांचा (liberal) आहे. वेदांचे ज्ञान-तीर्थ हे केवळ ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तीन वर्णांनाच मिळू शकत होते आणि स्त्रिया व शूद्रांना हे ज्ञान प्राप्त करण्याचा अधिकारच नव्हता. माउली म्हणतात की ही मागची चूक सुधारण्यासाठीच वेद परत एकदा गीतारुपी प्रकट झाले. आता गीतेच्या रूपात वेदांचे अमृत सर्व मुमुक्षु साधकांपर्यंत पोचू शकते. एखादी आई जशी आपल्या मुलांमध्ये भेदभाव करीत नाही, तशीच गीता ही सर्व समुदायी आहे. हिच्यामुळे मोक्षाचे दान सर्वसाधारण मनुष्यापर्यंत पोहोचू शकते. थोडक्यात सांगायचे म्हणजे श्रीकृष्णाने, अर्जुनाचे निमित्त करून गीतेद्वारा साऱ्या जगाचाच उद्धार केला आहे.

**ज्ञानेश्वरी -** वर नमूद केलेले गीतेचे महत्व, ज्ञानेश्वरीच्या ओव्या वाचल्यावरच समजू शकते. ज्यांनी फक्त गीताभ्यास केला असेल, त्यांना हा फरक कदाचित समजला नसेलही! सर्व जगाला गीतेचे ज्ञान मिळावे म्हणून माउलींनी किती सुंदर पद्धतीने, जागोजागी उपमा वापरुन, ८०० वर्षांपूर्वीच्या मराठी भाषेत सर्व तपशील मांडला आहे. दुभती गाय समोर असली तरी धार काढायचे हातवळण असल्याशिवाय दूध मिळत नाही. तसेच ज्ञानेश्वरीचे आहे. गेले पावणे तीन वर्षे आम्हाला ह्या अमृततुल्य ज्ञान-दुधाची चव, सौ. नीलिमाताई कुळकर्णी, यांच्या ओंजळीतून मिळाली आहे. नीलिमाताईंमुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या वर्गाला मन-बुद्धीचे सात्विक पोषण मिळाले आहे.

ज्ञानेश्वरी वाचायची माझी ही दुसरी वेळ. पहिल्या वेळेस माउलींच्या लिखाणाची गोडी लागली तर, दुसऱ्यांदा त्या गोडीत भावार्थाची भर पडली. अशीच माऊलींची माया व ज्ञानेश्वरीची सतत विकसित होणारी शिकवण, माझ्या जीवनात कायम राहू दे हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

- **नीता धोपेश्वरकर,** पारसीपनी, न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## स्त्रीचा दिवस

आला का ग, ह्यावर्षीचा
जागतिक दिन स्त्रीचा
कधी मायेचा ओलावा
कठोरपणा शिस्तीचा
वेगवेगळ्या रुपात
हात असतो आईचा
तीच दुर्गा तीच गौरी
सांभाळ करी जीवाचा
आटापिटा हा करून
तोल सावरते बाळांचा
बहीण ती भार्या ती
अंतराळवीर आजची
रणांगणावर मर्दिनी
डंका वाजवी शौर्याचा
नित्य कर्म तिचे करताना
आव्हाने काहीही असताना
कार्यप्रवाह सुरळीत असते
देते लक्ष्य मात्र दाही दिशांना

- **सौ. रेखा मुळे,** मनालपन, न्यू जर्सी

# आर्टेमिस, चंद्र आणि मानवापुढची कसोटी

एप्रिल २०२६ मध्ये क्रिस्टिना हॅमॉक कोच, जेरमी हॅन्सन, व्हिक्टर ग्लोव्हर आणि रीड वाइझमन, हे आर्टेमिस-२चे चार अंतराळवीर चंद्राभोवती फेरी मारून सुखरूप पृथ्वीवर परत आले, आणि चंद्र पुन्हा एकदा लोकांच्या कल्पनाविश्वात जिवंत झाला. अपोलो-१७ नंतर अर्धशतकाहून अधिक काळ मानवाने चंद्राकडे अशी झेप घेतली नव्हती. म्हणूनच अनेकांना हा क्षण एका जुन्याच पण आल्हाददददायक स्वप्नासारखा भासला. गेल्या आठवड्यात भेटलेल्या एका उबर चालकानेही उत्साहाने विचारले: "माणूस पुन्हा चंद्रावर जाणार म्हणे?" अंतराळ कार्यक्रमांविषयी रोज माहिती न वाचणाऱ्यांपर्यंतही हा आनंद पोचतो, यातच या मोहिमेचे वेगळेपण आहे. अपोलोने दाखवून दिले की चंद्र गाठता येतो. आर्टेमिसचे ध्येय वेगळे आहे: चंद्रावर मुक्काम करता येईल का, तिथे तळ ठोकता येईल का, आणि अल्प मुक्कामांपासून दीर्घ मुदतीची वसाहत स्थापता येईल का? मंगळ, आणि सूर्यामालेच्याही पलीकडच्या भराऱ्यांसाठी चंद्र एक महत्वाचा टप्पा आहे.

अपोलोच्या काळात चंद्रावर पोहोचणे हेच मुख्य ध्येय होते. त्या काळचा प्रत्येक यशस्वी टप्पा इतिहासात कोरला जाईल, याची जाण होती. पण त्या मोहिमा काहीशा धाडसी, आणि अल्पकाळ टिकणाऱ्या होत्या. एखाद्या अवघड डोंगरशिखरावर पोहोचून झेंडा रोवण्यासारख्या. आर्टेमिस मात्र एक संपूर्ण व्यवस्था उभी करण्याचा प्रयत्न आहे: नवीन अंतराळपोशाख, यंत्रमानवांद्वारे आधीच पोचवली जाणारी साधनसामग्री, त्यासंबंधीत व्यापारी भागीदाऱ्या, चांद्रकक्षेतील आधार व्यवस्था, पुढे अधिक सक्षम लँडर, पृष्ठभागावर ऊर्जानिर्मीती वगैरे. चंद्राला 'भेट द्यायची जागा' न समजता तिथे काम, संशोधन आणि दीर्घ उपस्थिती शक्य होईल अशा दिशेने टाकलेले हे पाऊल आहे.

हा बदल या मोहीमेत वापरलेल्या तंत्रज्ञानातही दिसतो. अपोलो मोहिमांतील अंतराळवीर चंद्रावर सहज फिरत होते, अशी प्रतिमा आपल्या डोळ्यांसमोर असते. पण प्रत्यक्षात त्यांचे अंतराळपोशाख इतके जाड होते की कंबरेत आणि गुडघ्यांत नीट वाकणे अवघड जाई. जमिनीवर बसून दगड उचलणे, जवळच्या वस्तूंवर काम करणे, उपकरणे नीट हाताळणे या सगळ्यांसाठी खूप श्रम लागत. जाड हातमोज्यांमुळे साधी कामेही कठीण जात. एकूणच साधने हाताळण्याची कार्यक्षमता खूपच कमी असे.

आजचे नवीन चांद्रवेष याच अनुभवांमधून शिकत बनवले जात आहेत. अंतराळवीरांना गुडघे अधिक वाकवता यावेत, कंबरेत झुकता यावे, नमुने गोळा करताना अधिक स्थिरपणे काम करता यावे, खडकाळ भागात आणि उंचसखल प्रदेशात अधिक चपळपणे हालचाल करता यावी, यावर भर आहे. म्हणजेच माणूस चंद्रावर एखाद्या फुगवलेल्या कवचात अडकून कसाबसा काम करणारा जीव न राहता एक कार्यक्षम वैज्ञानिक होऊ पाहतो आहे. फरक एवढाच की त्याच्या आजूबाजूला पृथ्वीसारखे वातावरण नाही, आणि चुका परवडणाऱ्या नाहीत.

अवकाशयानातही तफावत आहे. अपोलोच्या कमांड मॉड्यूलमध्ये राहण्याजोगी जागा सुमारे २१० घनफूट होती. साधारण ५ फूट × ६ फूट × ७ फूट एवढ्या लहानशा खोलीएवढी. आर्टेमिसच्या ओरायनमध्ये ती सुमारे ३३० घनफूट आहे, साधारण ६ फूट उंचीच्या ५ फूट × ११ फूट तंबूएवढी, किंवा दोन मिनिवॅनच्या आतील भागाएवढी. अंतराळप्रवासात वजन कमीतकमी ठेवायचे असल्याने एवढाही फरक महत्त्वाचा असतो.

याचा अर्थ असा का की आपण चंद्रावर वसाहत उभारण्याच्या जवळ आहोत? नाही. उलट, आत्ताच सर्वांत जास्त गरज आहे ती वास्तवदर्शीपणाची.

कारण चंद्रावर आठवडा-दहा दिवस राहणे आणि तिथे खरोखर "राहू लागणे" या दोन अगदी वेगळ्या गोष्टी आहेत. पृथ्वीवरून पुरेसा अन्नसाठा, ऑक्सिजन, सुटे भाग, औषधे, आणि परतीची हमी असलेला एक छोटा ताफा काही दिवस निभावून नेऊ शकतो. पण एखादा खरा तळ सतत कार्यरत ठेवायचा असेल, तर त्याला अंधारातही ऊर्जा हवी, तापमानाच्या अतिरेकातून बचाव हवा, धुळीपासून उपकरणे आणि फुप्फुसे दोन्ही वाचवावी लागतील, किरणोत्सर्गापासून संरक्षण हवे, पाणी आणि हवेच्या पुनर्वापराची व्यवस्था हवी, अपघात किंवा आजारपणाच्या वेळी तत्काळ निर्णय घेण्याची क्षमता आणि मदतीचा मार्ग हवा. "आपण तिथे उतरलो" आणि "आपण तिथे राहू शकतो" यांच्यामध्ये प्रचंड तांत्रिक दरी आहे.

ऊर्जा हा त्यातील मुख्य प्रश्न. चंद्रावर सौरऊर्जा वापरता येईल, विशेषतः ध्रुवीय प्रदेशातील अशा उंच भागांत, जिथे बराच काळ सूर्यप्रकाश टिकतो. कारण चंद्रावरचा "दिवस" हा पृथ्वीवरील दिवसासारखा नसून सुमारे पृथ्वीवरील पंधरवड्याइतका मोठा असतो. १५ दिवस २५० अंश फॅरनहाईट पर्यंत जाणारे तापमान (पाण्याचे

बाष्पीभवन २१२ अंश फॅरनहाईटला होते) आणि त्यानंतर जवळजवळ तितकाच मोठा अंधाराचा काळ येतो (या दरम्यान तापमान उणे ३०० अंश फॅरनहाईट असू शकते). त्यामुळे सौरऊर्जा उपयुक्त असली, तरी तिच्यावरच पूर्ण अवलंबून राहायचे असेल तर ऊर्जा साठवावी लागेल, आणि उर्जेच्या वितरणाची व्यवस्था करावी लागेल. म्हणूनच इतर पर्यायांवर संशोधन सुरू आहे. उदाहरणार्थ काही ठिकाणी आढळणारा बर्फ. ध्रुवीय विवरांमध्ये आढळणारे बर्फरूप पाणी शुद्ध करून त्याचे हायड्रोजन आणि ऑक्सिजनमध्ये विभाजन करता आले, तर भविष्यात त्यापासून इंधन आणि ऑक्सिडायझरही तयार करता येऊ शकतील. म्हणजेच चंद्रावरील पाणी ही फक्त 'संसाधन' म्हणून नव्हे, तर ऊर्जा आणि पुढच्या मोहिमांच्या दृष्टीनेही महत्वाचे ठरू शकते. किंवा, विघटनावर आधारीत छोट्या अणुभट्ट्या. पण उर्जेचा स्रोत मिळाला म्हणजे वसाहत उभी राहिली, असे नाही. अखंड वीज आवश्यक असली तरी पुरेशी नाही.

याच कारणामुळे यंत्रमानव मोहिमा अजूनही मध्यवर्तीच राहायला हव्यात. एखादा रोव्हर खडतर प्रदेशात जाऊ शकतो, बर्फाच्या खुणा शोधू शकतो, जमिनीचे परीक्षण करू शकतो, अवघड उतरंडींची चाचणी घेऊ शकतो, धोके कुठे आहेत हे नकाशात दाखवू शकतो (दूर मंगळावर रोव्हर्सने हे करून दाखवले आहे). रोव्हर/यंत्रमानव अपयशी झाले तरी ते प्रशिक्षित मानवांच्या जीवहानीइतके विदारक ठरत नाही. माणूस आणि यंत्रमानव यापैकी एकाचीच निवड करायची आहे, असे समजणे चुकीचे ठरेल. उलट, शोधमोहीमांची योग्य नीती अशीच असेल की यंत्रमानव आधी जाऊन गंतव्य स्थानाचा अंदाज घेतील, मोजमाप करतील, धोके ओळखतील, आणि जिथे मानवी उपस्थितीची खरोखर गरज आहे तिथेच माणसांना पाठवले जाईल.

चंद्र पुन्हा राजकीयही झाला आहे. ही केवळ विज्ञानकथेसारखी कल्पना राहिलेली नाही. चंद्राच्या ध्रुवीय भागात दीर्घकाळ सूर्यप्रकाश मिळू शकणारे काही उंच भाग, जवळच कायम सावलीत असलेली विवरे, आणि तिथे असलेले बर्फरूपातील पाणी, ही सगळी संसाधनदृष्ट्या आणि धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे आहेत. अशा वेळी चंद्राच्या पृष्ठभागावर "कोण कुठे काम करणार", "सुरक्षित अंतर किती", "समन्वय आणि नियंत्रण यांची सीमारेषा कुठे" अशा प्रश्नांना महत्त्व येणारच. म्हणून आर्टेमिस करारांत शांततापूर्ण वापर, वैज्ञानिक माहितीची देवाणघेवाण, आणि परस्पर हस्तक्षेप टाळण्यासाठी 'सेफ्टी झोन्स'सारख्या कल्पना आहेत. कागदावर या गोष्टी संयुक्तिक आहेत; पण जगातल्या राजकारणासारखेच, प्रत्यक्ष वापरात त्यांचे स्वरूप कसे बदलेल, हा प्रश्न विचाराआड करता येणार नाही.

भारताची स्थिती या संदर्भात विशेष लक्षवेधी आहे. भारत आर्टेमिस करारांचा भाग आहे, त्याचवेळी चांद्रयान मोहिमांद्वारे भारताने स्वतःचा ठसाही उमटवला आहे. पुढे नमुने पृथ्वीवर आणण्याच्या आकांक्षा, ध्रुवीय प्रदेशातील अधिक सखोल अभ्यास, आणि समानव मोहिमांचा दीर्घकालीन विचार, या दिशेनेही भारताची वाटचाल आहे. म्हणजेच सहकार्य आणि स्वायत्त महत्त्वाकांक्षा एकत्र अस्तित्वात राहू शकतात. भारत हा केवळ 'छावणीत दाखल झालेला' मांडलीक नाही; तो स्वतःचा मार्ग आखत, स्वतःची उपस्थिती नोंदवत या नव्या चांद्रयुगात पाऊल टाकतो आहे.

आर्टेमिसच्या पुढच्या पायऱ्याही तितक्याच लक्षवेधी आहेत. सध्याच्या आराखड्यानुसार २०२७ मध्ये आर्टेमिस III मोहिमेत पृथ्वीभोवतीच्या कक्षेत ओरायन आणि चांद्रलँडरच्या डॉकींगची महत्त्वाची चाचणी होईल. त्यानंतर २०२८मध्ये आर्टेमिस IV मोहिमेत मानव पुन्हा चांद्रपृष्ठावर उतरण्याचा प्रयत्न करेल. म्हणजेच पुढची वाटचाल सरळ "आता चंद्रावर उतरणे" अशी नसून आधी अवकाशात व्यवस्था जुळवून आणणे, आणि मग प्रत्यक्ष उतरणे अशी आहे.
इतकेच नव्हे, तर चीननेही २०३० पर्यंत मानवाला चंद्रावर उतरवण्याचे ध्येय जाहीर केले आहे. त्यामुळे पुढचे चांद्रयुग हे फक्त अमेरिकेचे वा आर्टेमिसपुरते मर्यादित राहणार नाही, हे स्पष्ट आहे.
इथेच एक जुनी विज्ञानकथा आठवते. बेन बोव्हा यांच्या Men of Good Will (मराठी भाषांतरासाठी पहा: https://aisiakshare.com/node/8860) या १९६४सालच्या कथेत चंद्रावरील स्पर्धेचे एक सावट दिसते. सगळ्यांना आपण विवेकी आहोत असे वाटत असतानाही स्पर्धा, संशय, प्रतिष्ठा आणि हक्क यांचे गणित कसे बिघडू शकते, याची ही कथा. विज्ञानकथेतील तपशील आपल्या काळाशी जुळतीलच असे नाही. पण तिचा गाभा अजूनही जिवंत आहे: पृथ्वीवरील आपले स्वभाव, आपले अहंकार, आपली स्पर्धा, हे आपण पृथ्वीपुरतेच ठेवू शकू का? की ते चंद्रावरही आपल्या पाठोपाठ जाणार?

याचा अर्थ असा नाही की चंद्रावरील भवितव्य अनिवार्यपणे संघर्षमयच असेल. त्याउलट, तो सहकार्याचाही एक सुंदर नमुना बनू शकतो. एकमेकांच्या मोहिमांना मदत, सामायिक वैज्ञानिक साधने, पारदर्शक नियम, हेही शक्य आहे. पण अशी सहकार्याची संस्कृती आपोआप तयार होत नाही. ती घडवावी लागते. आणि त्यासाठी तांत्रिक कौशल्याबरोबरच तितकीच राजकीय परिपक्वता लागते.

आर्टेमिसचे म्हणूनच कौतुक करायला हवे, पण भाबडेपणाने नव्हे. हो, आजचे अंतराळपोशाख अधिक सक्षम आहेत. हो, ओरायन अधिक राहण्याजोगे आहे. हो, चंद्राभोवतीचे आणि चंद्रावरील पायाभूत तंत्रज्ञान अपोलोपेक्षा खूप प्रगत आहे. पण एक आठवड्याचा मुक्काम म्हणजे वस्ती नव्हे. अधिक जागा म्हणजे आराम नव्हे. अणुऊर्जा म्हणजे स्वयंपूर्णता नव्हे. आणि करार म्हणजे कायमचा सलोखा नव्हे.

चंद्रावर परत जाण्याचा खरा प्रश्न “आपण जाऊ शकतो का?” हा नाही. खरा प्रश्न आहे, “आपण तिथे शहाणपणाने जाऊ शकतो का?” यंत्रमानवांच्या साहाय्याने, वास्तववादी कालमर्यादा ठेवून, विज्ञानाला मध्यवर्ती ठेवून, आणि पृथ्वीवरचे राजकीय विकार तिथे नेणे टाळून?

जगभरात अनेक ठिकाणी मूलभूत विज्ञानाची पायामल्ली होत असताना, काही ठिकाणी छद्मविज्ञानाला प्राधान्य मिळत असताना, चंद्राकडे जाणारा मार्ग पुन्हा खुला झाला आहे. आता कसोटी रॉकेटांचीच नाही; ती आपल्या संयमाची, आपल्या प्राधान्यक्रमांची आणि आपल्या राजकीय प्रगल्भतेची आहे.

- **आशिष महाबळ**, पॅसडीना, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका




**राशिभविष्य : मे २०२६**

**“शुक्र गुरु सोबत वातावरण प्रणयमय करतो."**

**अजय तनखीवाले**
https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## पारावरच्या गप्पा

नेहमी प्रमाणे महिन्याच्या पहिल्या शनिवारी आम्ही सगळे मित्रमंडळी जमलो होतो. गप्पा छान रंगात आल्या होत्या. आमचा एक मित्र, वरुण,जो मूळचा सातारा जवळच्या गावातला. तो नेहमीच गावाकडच्या गप्पा सांगायचा. गप्पा कसल्या मजेच्याच गोष्टी जास्त असायच्या. त्यात मला प्रामुख्याने आवडलेली गोष्ट म्हणजे संध्याकाळच्या वेळी गावाकडची लोक घरासमोरच्या झाडाच्या पारावर निवांतपणे गप्पा करत असायची. बहुतेक वेळा दिवसभर काय झाले. कोणाकडे कोण पाहुणे आले, अश्या विचारपूस करण्याऱ्या गोष्टी, पण कधी कधी गोष्टीतून गोष्टी, वेगवेगळे विषय निघायचे आणि गप्पांना अजून रंगत यायची. अश्या रंगलेल्या गप्पांची वर्णने वरुण आम्हाला नेहमीच सांगायचा.

आज शेवटी मी वरुणला म्हणालेच की तू कधी आम्हाला तुझ्या गावाकडे घेऊन जाणार आहे. मला पण त्या पारावरच्या गप्पा कश्या असतात ते बघायचे आहे, ऐकायचे आहे. हे ऐकून वरूण हसतच सुटला, म्हणत की अश्या काही गप्पा ठरवून होत नसतात त्या अगदी सहजपणे होतात. जेव्हा आपण आपल्याच लोकात, मित्रमंडळींमध्ये असतो तेव्हा, जेव्हा तुम्ही तुमच्याच लोकात असताल तेव्हा ते आपसुकच होतात. हे सगळे ऐकले तरी माझे कुतूहल कायमच होते. कारण मी कधीच गावाकडे गेले नव्हते की गावातले जीवन अनुभवले नव्हते.

यावेळी अगदी ठरवून मी वरूणला विचारले की तो कधी परत गावी जाणार आहे. त्यावेळी माझी मैत्रीण शुभदा पण यायला तयार झाली होती. मग वरुणचे गावच आमच्या गप्पांचा विषय झाला. बघता बघता सगळेच म्हणाले की आम्हाला पण वरुणचा गाव बघायचा आहे. मग गप्पांचे रूपांतर travel planning मध्ये झाले. नंतर जवळ जवळ महिन्याने आम्ही सगळे निघालो. प्रवास फारच लांबचा होता पण आम्ही सगळे मित्रमंडळी बरोबर होतो तर प्रवासाची वेगळीच मजा होती.

पहिला प्रवास विमानाने मुंबईला, मग रेल्वेने साताऱ्याला आणि मग एस. टी. (state transport) बसने गावाच्या फाट्यापर्यंत, तिथून एकतर ५ मैल चालत जायचे किंवा दुसऱ्या एस.टीची वाट पाहायची. आयुष्यात असा प्रवास आम्ही बरेच जण पहिल्यांदाच करत होतो. प्रत्येक क्षणी आमची उत्सुकता वाढतच होती की आता पुढे काय. आम्ही साताऱ्यापर्यंत येऊन पोहोचलो, तेव्हा

कळले की एस. टी काही तास उशीराने निघणार आहे. पुढच्या प्रवासाची उत्सुकता होती तरी पण इथे काय आहे त्याचे पण कुतुहूल होते.

साताऱ्याच्या एस.टी स्टॅंडवर आत मध्ये बसायची जागा होती आणि बाहेर पण झाडांभोवती सिमेंटचे कट्टे बांधले होते. त्यावर बसून आम्ही जाण्या येणा-यांची मजा बघत होते. वरुणने आमच्यासाठी वडा पाव आणि कोरडी भेळ आणली, जी या एसटी स्टॅंडची खासीयत होती. मग काय, खाता खाता अजून इथे काय मिळते, तसेच साताऱ्याचे कंदी पेढे कसे छान आहेत याची चर्चा सुरु झाली. येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांच्या लकबी, त्यांच्या आपापसातल्या संवादामधली काही वाक्य कानावर आली ती परत दुसऱ्या प्रवासाच्या संवादाशी जोडली आणि अशी संवादाची श्रृंखला केली तर कसे मजेशीर संवाद तयार होत आहेत ते पाहून अचंबित होत होतो.

मध्येच शुभदाला कोणी एक व्यक्ती तिच्या मावशीसारखी वाटली. जवळजवळ ती पळतच जाऊन त्यांना भेटणार होती की इकडे कुठे म्हणून. तेवढ्यात त्या मावशीने त्यांच्या मुलीला हाक मारली तो आवाज ऐकून माझ्या मावशी सारखी आहे पण ती माझी मावशी दिसत नाहीये असं सांग शुभदा उठलेली बसली.

तेवढ्यात आमचा दुसरा मित्र विनय समोरच्या एसटीच्या पाट्या बघून ओरडलाच, की बघितले का समोरची गाडी सुंदरगडला जाणारी आहे. सुंदरगडाबद्दल वाचले होते पण असा काही गड आणि असे काही गाव असेल असे वाटले नव्हते. शिवाजी महाराजांच्या काळातला हा छोटेखानी गड अजून बऱ्यापैकी शाबूत होता असे . खूपच वर्षापूर्वी वाचलेले ही पाटी बघून आठवले. मग काय सगळ्यांनीच समोरच्या गाड्यांच्या पाट्या वाचायला सुरवात केली की बघू तरी अजून कोण कोणत्या जागा आहेत. त्याचबरोबर मोबाईलवर त्याचे ठिकाण कुठे आहे हे सगळे बघायला लागले. वरुण आमची मजा पाहत होता. आमची भेळ, वडा पाव खाऊन संपला, हे पाहून चहा घेणार की उसाचा रस घेणार हे विचारत होता. साहजिकचं सगळ्यांनीच उसाचा रस पाहिजे हे एकमुखाने सांगितले. आम्ही एकूण सहा जण होतो. विनय वरुणसोबत रसाचे ग्लास आणायला मदत करण्यासाठी गेला. निघताना विनयने गौतमला विचारले, “तू येतोस का? म्हणजे प्रत्येकाला दोन ग्लास आणता येतील.”

मी, शुभदा, अर्पणा आमची खातीरदारी होत आहे हे पाहून सुखावलो होतो. बोलता बोलता लहानपणच्या, आजी आजोबांकडे सुट्टीला जायचो त्या गोष्टी निघाल्या. इतक्या वर्षांची मैत्री असूनही आम्हाला एकमेकांच्या लहानपणातील गोष्टी किंवा त्या वेळच्या आठवणी फारशा माहीत नव्हत्या. नेहमी जे भेटणे व्हायचे त्यात कामाच्या गोष्टी आणि त्या अनुषंगाने असण्याऱ्या गोष्टी बोलल्या जायच्या. मुख्यत्वे करून आता काय चालले आहे ते. आता सगळ्यांच्या लहानपणच्या मजा, विविध गोष्टी, प्रत्येकांचे त्यांच्या आजी आजोबांबरोबर असलेले नाते, सगळेच भूतकाळातले आठवून घराची ओढ वाटायला लागली होती. आमचे चेहरे पाहून वरुण म्हणाला “काय झाले एवढ्यात, असे काय चेहरे करून बसला आहात”. मग मी आमचे कसे लहानपणाच्या गोष्टींबद्दल बोलणे झाले तेव्हा लहानपणी आजी आजोबाकडे कशी सुट्टी घालवायचो ते आठवून त्यांच्या आठवणी यायला लागल्या आहेत.

वरुण, विनय, गौतमने आम्हा तिघांना रसाचे ग्लास दिले. उसाचा रस पितापिता इथला ऊस, साखर कारखाने याबद्दल बोलणे सुरू झाले. रस पिऊन होत नाही तर आपली गाडी लागली आहे असे वरूण म्हणाला. पुढच्या प्रवासाच्या कुतुहलात आम्ही एस टी मध्ये चढलो. मी चढताना म्हणाले की Reservation करायचे आहे का? त्यावर वरुण म्हणाला Reservation ची गरज नाही. जिथे जागा असेल तिथे बसा, गाडी सुरु झाली की कंडक्टरकडून तिकिट घेऊ. हा माझा एसटीचा पहिलाच प्रवास होता. पुढे काय ही उत्सुकता होतीच. आम्हाला समोरासमोरच्या ३-३ अश्या जागा मिळाल्या. त्यामुळे परत आम्हाला आमच्या गप्पा चालू ठेवता येणार होत्या. गाडी सुरु झाली, १-२ तासांचाच प्रवास होता. नशीबाने ही गाडी अगदी वरुणच्या गावापर्यंत जाणार होती. म्हणजे फाट्याला उतरायला लागणार नव्हते.

थोडे स्थिरस्थावर झाल्यावर वरुण माझ्याकडे पाहून हसायला लागला. आश्चर्याने त्याच्याकडे बघत मी म्हणाले “काय झाले माझ्या चेहऱ्यावर काही लागले आहे कां ?” तर म्हणतो कसा “तुम्हा सगळ्यांनाच जेव्हा मी म्हणायचो की “पारावरच्या गप्पा” त्यावेळी तुम्ही हे म्हणजे काय ? असे आश्चर्य व्यक्त करत असायचा, तर तुम्ही तुमच्या नकळत तेच केलेत. साताऱ्याच्या एस.टी. स्टॅंडवर तुम्ही ज्या मनमोकळ्यापणे, म्हणजे जसा विषय निघेल तसे बोलत राहीलात, तर पारावरच्या गप्पा याहून काही वेगळ्या नसतात. बोलायचे विषय कदाचित वेगळे असतील”. नंतर मजेने म्हणतो कसा, ”मग अजून जायचे आहे का माझ्या गावी, का परत जायचे आहे ? ” तेव्हा सगळे एकमेकांकडे बघत हसत हसत म्हणाले की “आता पारावर बसून आजच्या पारावरच्या गप्पांची गोष्ट सांगू”.

- **उत्तरा भालेराव**, टॅम्पा, फ्लोरिडा

## श्री स्वामी समर्थ



श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कृपाशीर्वादाने आणि परम पूज्य गुरुमाऊलींच्या मार्गदर्शनाखाली, यंदाचा श्री स्वामी समर्थ प्रकट दिन उत्सव अमेरिकेतील विविध राज्यांमध्ये अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

कॅलिफोर्निया (बे एरिया व लॉस एंजेलिस), वॉशिंग्टन, अरिझोना, टेनेसी, टेक्सास, न्यू जर्सी, ओहायो, मिशिगन, नॉर्थ कॅरोलिना आणि जॉर्जिया या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर भक्तांनी सहभागी होऊन हा उत्सव अनुभवला.

उत्सवात अभिषेक, पंचोपचार पूजन, पालखी, महाआरती आणि महाप्रसाद यांचे सुंदर आयोजन करण्यात आले होते. भक्तांनी मोठ्या श्रद्धेने या सर्व सेवांमध्ये सहभाग घेतला.

बालसंस्कार विभागामार्फत मुलांनी मनाचे श्लोक आणि स्वामी चरित्र सारामृतातील शिकवण सादर करून सर्वांना प्रेरणा दिली. तसेच मातृ-पितृ पूजनाचा उपक्रम आयोजित करून मुलांमध्ये संस्कारांची जपणूक करण्याचा सुंदर प्रयत्न करण्यात आला.

लहान मुलांसाठी विशेष आकर्षक प्रदर्शन, तसेच युवकांसाठी युथ एम्पॉवरमेंट विषयांवरील मार्गदर्शक प्रदर्शन यामुळे सर्व वयोगटांमधील भाविकांना काहीतरी नवीन शिकण्याची संधी मिळाली.

गर्भसंस्कार, शिशु संस्कार, बालसंस्कार, युवक विकास आणि पालकत्व या विषयांवर माहितीपूर्ण स्टॉल्स लावण्यात आले होते. याशिवाय प्रश्नोत्तर विभागामार्फत विविध प्रश्नांवर मार्गदर्शन दिले गेले. वास्तुशास्त्र आणि भारतीय संस्कृतीवरील प्रदर्शनांनीही सर्वांचे लक्ष वेधून घेतले. लहान मुलांसाठी विशेष प्रदर्शनांद्वारे दत्तगुरूंचे २४ गुरु, मनाचे श्लोक कथा स्वरूपात, तसेच श्री स्वामी समर्थ महाराजांची अवतारप्रणाली सोप्या व आकर्षक पद्धतीने समजावून सांगण्यात आली.

ग्रंथ विभागामध्ये सेवामार्गातील विविध पुस्तके भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली होती तसेच त्या ग्रंथांमधून मिळणाऱ्या शिकवणीची माहितीही प्रदर्शित करण्यात आली.

उत्सवाच्या निमित्ताने अन्नदान उपक्रम राबवण्यात आला असून, संकलित केलेले अन्न स्थानिक फूड बँक्सना देण्यात येणार आहे, ही सेवाही अत्यंत स्तुत्य ठरली.

अशा प्रकारे भक्ती, सेवा आणि संस्कार यांचा सुंदर संगम असलेला हा प्रकट दिन उत्सव सर्वांसाठी एक आध्यात्मिक आणि प्रेरणादायी अनुभव ठरला.

सेवामार्गामध्ये सहभागी होण्यासाठी (४०९)३९६-०३८२ या क्रमांकावर WhatsApp द्वारे संपर्क करावा.

## वय

वय ! वय ! असतं तरी काय?
पांढरे केस, पांढरी मिशी की गळालेले हात पाय ?
गळले असतील हात पाय, गळून पुन्हा उभे ठाकले
गळून जाता भंगून जाऊन, फिरून पुन्हा दृढ जाहले
झाले असतील केस पांढरे, आयुष्याची उन्हे झेलून
वळणा वळणावर चालताना, आघातांची कळा सोसून
म्हणे आले पोट पुढे, म्हणजे काय झाले हो ?
अवमान तो केवळ गिळून, निव्वळ जिरून गेले हो!
अनुभूती अन चिंतनाने, ग्रासलेली कांती
कसली चिंता, कसली हुरहूर, तूच तुझा सोबती
दिवस सरती, सरती पावसाळे,
ओसरती नाती अन भावनांचे उमाळे
असशील वा नसशील तू , क्षितिज तुला अनंत
क्षितिजाशी अंत तुझा, घे भरारी अनंत
अनंतात त्या रंगूनि जाऊनि, अंत दिसे न तुजला
आयुष्याचे गणित आगळे, शून्यातच अनंत गमला
वय ! वय ! शब्दच सारे, अखंड सोबती प्रवासातले
जाती विरूनि कण कणांत सारे, स्वच्छंद मुसाफिर सृष्टीमधले

- **चैत्राली काटे - यादव**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

# मराठवाडा पूरग्रस्त निधी लाभार्थी - एका शेतकऱ्याचा परिचय

**डॉ. हेमंत जोशी (Save the Farmers) आणि श्री. नितीन चव्हाण यांच्यातील दूरध्वनी संभाषणावर आधारित.**



अमेरिकेतील माझ्या सर्व मित्र आणि हितचिंतकांना माझा नमस्कार आणि मनःपूर्वक आभार. माझे नाव नितीन चव्हाण असून, मी महाराष्ट्रातील सोलापूर तालुक्यामधील 'उंडरगाव' या गावाचा रहिवासी आहे. गेल्या वर्षी, आमच्या भागात आलेल्या पुराच्या बातम्या आपण सर्वांनी ऐकल्या होत्या; त्यावेळी माझ्यासारख्या आणि इतर गावकऱ्यांना मदत करण्यासाठी आपण पुढे आला होतात. आपण आमच्या शेतांची झालेली नासधूस प्रत्यक्ष पाहिली होती. आमच्या पिकांना पाणी देण्यासाठी आपण आम्हाला 'मोटार पंप' उपलब्ध करून दिला होता.

गेल्या ६-७ महिन्यांपासून, माझ्या ५ एकर जमिनीवर मी उसाची लागवड करत आहे. हा ऊस आता साधारणपणे कमरेइतका वाढला आहे. त्या मोटार पंपाच्या साहाय्यानेच मला माझ्या पिकांना पाणी पुरवता आले. उपलब्ध असलेल्या पाण्याचा वापर करून, माझ्या काही शेतकरी मित्रांनी द्राक्षांचे पीक घेण्याचेही यशस्वीपणे नियोजन केले आहे.

आता, राज्य सरकारने काही मार्गदर्शक तत्त्वे (गाईडलाईन्स) जारी केल्या आहेत; त्यानुसार एप्रिल महिन्याच्या अखेरीपासून पुढील ३-४ आठवडे पाण्याचा वापर केवळ पिण्यासाठी आणि घरगुती कामांसाठीच केला जावा. या ४ आठवड्यांच्या कालावधीत शेतांकडे पाणी वळवले जाऊ नये, असे निर्देश आहेत. माझ्यासारख्या शेतकऱ्यांचे निसर्गावरील अवलंबित्व आजही कायम आहे. आम्ही अगदी छोट्या-छोट्या गोष्टींबद्दलही चिंतेत असतो; आणि जर सर्व काही सुरळीत पार पडले, तर मग आमच्या शेतमालाला योग्य भाव मिळेल की नाही, याची आम्हाला काळजी वाटू लागते. तरीही, आमच्या पिकांना पाणी पुरवण्याचा काहीतरी मार्ग शोधण्याचा आम्ही नक्कीच प्रयत्न करू.

आमच्याबद्दलची चौकशी करत राहा; जेणेकरून 'आपली काळजी करणारे कोणीतरी आहे,' ही भावना आम्हालाही जाणवत राहील.

**- श्री. नितीन चव्हाण**

# Jnana Prabodhini - Flood Relief Work Report

# (BMM Fundraiser 2025)

**Overview:** **Condition after flood:** Heavy flooding across Solapur district affected rural and urban areas, damaging homes, schools, sanitation and livelihoods. Families were displaced and basic services were disrupted.

**Need:** Immediate relief was required to stabilize families and prevent further distress. Multi-sector support was needed including shelter, health, education and livelihoods. Vulnerable groups required priority attention. Coordinated rehabilitation was essential.

**Intervention:** Activities were conducted across multiple villages and urban settlements after proper need assessment. Targeted interventions were implemented across sectors. Focus was on reaching genuine beneficiaries. Both relief and rehabilitation were addressed.

**Impact:**

- 325 families supported
- 275 students benefited
- Improved overall recovery and stability

## Tin Sheet Houses (Shelter Support)

**Condition after flood:** Houses were destroyed or severely damaged leaving families without safe shelter and exposed to weather conditions.

**Need:** Immediate shelter support was required to ensure safety and protection. Vulnerable families needed priority assistance. Temporary but durable housing solutions were necessary. Restoring dignity was important.

**Intervention:** Families were identified through field visits. Tin sheet houses were constructed in Mashal Wasti, Arjunsod and Wangi.

Materials were arranged locally for quick work. Follow-up ensured proper use.

**Impact:**

- 4 houses constructed
- 4 families rehabilitated
- Restored safety and dignity

### Washrooms – Koravali

**Condition after flood:** School sanitation facilities were damaged and unusable affecting hygiene and attendance especially of girls.

**Need:** Safe and separate sanitation facilities were required. Hygiene and privacy needed to be ensured. Attendance depended on proper facilities. Immediate repair was necessary.

Intervention: Assessment of school was conducted. Separate washrooms for boys and girls were constructed. Quality materials were used. Facilities were made functional for students.

**Impact:**

- 2 units constructed
- 150 beneficiaries
- Improved hygiene and dignity

### Livelihood Support

**Condition after flood:** Income sources were disrupted due to loss of tools and businesses.

**Need:** Support was required to restart livelihoods. Families needed income generating tools. Women and small earners needed targeted help. Long-term sustainability was important.

**Intervention:** Beneficiaries were selected based on need. Flour mills, sewing machines and other tools were distributed. Support matched previous occupations. Follow-up ensured usage.

**Impact:**

- 11 beneficiaries
- 6 units established
- Improved financial independence

### School Facilities Support

**Condition after flood:** School furniture and materials were damaged disrupting education.

**Need:** Basic infrastructure was needed to restart classes. Teaching aids were required. Learning environment needed improvement. Students required support.

**Intervention:** Schools in Tirhe, Aurad and Koravali were supported. Furniture and materials were provided. Projector added for digital learning. Facilities restored.

**Impact:**

- 3 schools supported
- 275 students benefited
- Improved learning environment

### Fodder Assistance

**Condition after flood:** Livestock faced fodder shortage due to flood damage.

**Need:** Immediate fodder was needed to protect livestock. Farmers required support to sustain income. Small farmers needed priority. Timely help was essential.

**Intervention:** Farmers were identified in Hattur, Wangi and Tirhe. Fodder was distributed in 10 kg bags. Distribution ensured fair reach. Volunteers coordinated delivery.

**Impact:**

200 farmers supported

- 10 kg per farmer distributed
- Protected livestock and income

### Health Camp

**Condition after flood:** Increased disease risk due to poor sanitation and water contamination.

**Need:** Healthcare access was needed for treatment and prevention. Free medicines were required. Early diagnosis was important. Vulnerable people needed attention.

**Intervention:** Health camp organized in Hattur. Doctors provided checkups. Medicines distributed. Awareness given.

**Impact:**

- 110 individuals treated
- 100+ kits distributed

- Improved health conditions

**Travel & Transportation**

**Condition after flood:** Relief work required reaching scattered and remote areas.

**Need:** Transport support was needed for assessment and delivery. Volunteers needed mobility. Accurate beneficiary identification required field visits. Timely logistics was important.

**Intervention:** Travel support provided to volunteers. Beneficiaries identified on ground. Materials procured and delivered. Coordination ensured effective work.

**Impact:**

- Multiple areas covered
- All activities supported
- Ensured timely delivery

**- Jnana Prabodhini Foundation Committee(USA)**




























## Project ASHA Fundraiser Report

Breast cancer awareness and Mammography camps during the month of March, 2026 were held in villages near Nagpur (Maharashtra), India. This **initiative has been made possible through BMM's donations, supported by contributions from Maharashtra Mandal of South Florida, Philadelphia Marathi Mandal, Delaware Valley Marathi Mitra Mandal, Triveni Mitra Mandal (Cincinnati), Austin Marathi Mandal, and Connecticut Maharashtra Mandal, who collectively raised more than $10,000 to benefit rural communities around Nagpur.** ASHA workers make it possible to reach local women and hold camps to raise awareness of breast cancer and get screened for the disease.

**Camp 1:** Maina Foundation, USA, sponsored Breast Malignancy Awareness & Mammography Screening for approximately130 ladies of Wathoda Village in Kalameshwar district of Vidarbha. Wathoda village is 50 kms away from Nagpur, Maharashtra. Dr. Anuradha Shrikhande addressed 60 women giving information on Breast Cancer.

Population of the village is 600, around 130 females between age group of 30-65 were screened for presence of any breast lump and subsequently screened by Mammography for Radiological confirmation.

**Camp 2:** 59 ladies attended this camp in a rural area. Self-palpation of breast was taught and were examined by members of Sickle Cell Association Nagpur.

40 participants of this group were sent on March 9 2026 to Shalinitai Meghe Hospital, Radiology Department for Mammography screening.

Those with suspected abnormality will be followed up and treated at the hospital. Subsequent Batches of ladies will be sent for Mammograms in the following week. Along with this Pap screening will also be done to rule out Cervical cancers

Transport & Food was provided by Shalinitai Meghe Hospital and Rotary Club of Nagpur.

**Camp3:** Total 40 ladies, mammography was done for all.

ASHA workers were involved in organizing these camps.

- **Alka Shrikhande**, Founder-Maina Foundation (USA)










AUGUST 6th, 2026 | SEATTLE, WA
BMM BConnect
AI SUMMIT 2026
AI for All: People | Planet | Progress
Keynote Sessions
Industry Deep Dives
Sustainability Panel
Women in AI Leadership
AI + Cybersecurity Shark Tank
Startup Pitches & Innovation Awards
Hands-On Worksnops
Hands-On Workshops
Generative AI & Agentic AI
Launching
BMM AI INNOVATION NETWORK (BAIN)
Connecting Global Minds
Join us to Shape the Future of AI!
Responsible AI & Governance
Cross-Border Innovation
The Future of Work
https://bmmonline.org/bconnect | Anand.Chouthai@bmmonline.org
732-425-7591



MEDICAL INTERNSHIP /
SHADOW PROGRAM IN INDIA
July – August 2026
1-4 Week Internship / Shadowing Opportunities
Placement Based on Student Preferences
Accommodation Assistance Available if Needed
Safe Learning Experience, Gain Hands-On Insight!
Limited Spots – Apply Now!
Nominal Admission Fee | Students Arrange Own Travel
If interested – please fill out the form at
https://bmmonline.org/arogyasampada/


VOLUNTEERS SIGN UP!
for
BMM Bconnect Initiative
& Convention
August 2026
Seattle
BMM VOLUNTEER
VOLUNTEER
Sign Up Today!
Event Support
Registration
Hospitality Team
Join the Team!


AVANA
SENIOR CARE
Pune, India
PEACE OF MIND FOR YOU & YOUR LOVED ONES
Professional senior care with a personal touch.
Co-Founded by Ms Niharika
MHA- Mount Sinai Hospital, NY
Senior Living Mgt - Cornell University, NY
SERVICES WE OFFER
Independent Living
Assisted Living
Day Care
Wellness & Rehabilitation
Medical Support & Emergency Management
Pet Therapy & Companionship
TRY BEFORE YOU DECIDE
BOOK A TRIAL STAY TODAY!
+91 9090070782
avanaseniorcare.com





For more details visit: https://bmmonline.org/bvg/

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.



***Pretty in Pink***
**Artist: Alka Vaidya**
Medium:Watercolor
Price:$350
Mandal: EBMM



**Artist: Radha kirtane**
Dimensions:9.5" x 9.5"
Medium:Acrylic
Price:
Mandal: Tennessee MM



***Ghost of the Wild***
**Artist: Aditi Gadgil**
Dimensions:30"x30"
Medium: Acrylic on canvas
Price:$1600
Mandal: M M of Detroit.



**Artist: Aparna Deshpande**
Dimensions: 9"x12"
Medium:Ink and watercolor
Price:$150
Mandal: Marathi Vishwa NJ



***keep clean***
**Artist: Avi Sadhu**
Dimensions:18"x 20"
Medium: oil on canvas
Price:Not for Sale
Mandal:MMLA



***Into the Blue***
**Artist: Aditi Gadgil**
Dimensions:24"x18"
Medium: Acrylic on canvas
Price:$395
Mandal: Maharashtra Mandal of Detroit.

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*The buyer is responsible for shipping and handling.